सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०४ एप्रिल २०२६ | वर्ष - ३२ | अंक ३५५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### मालदा हिंसाचाराच्या सूत्रधाराला अटक

कोलकाता : पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यातील कालियाचक इथल्या हिंसाचाराचा सूत्रधार आणि एआयएमआयएम नेते मोफक्करुल इस्लाम याला आज, शुक्रवारी बागडोगरा विमानतळाहून अटक करण्यात आली. मोफक्करूल पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले. देशाच्या इतर राज्यांप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये देखील मतदारयादी पुनर्निरीक्षणाचे (एसआयआर) सुरू आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात अवैध मतदार आणि बांगलादेशी घुसखोरांची नोंद मतदार यादीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### विकेंडमुळे वाहतुकीची कोंडी

माणगाव : उन्हाळी सुट्ट्यांची सुरुवात आणि सलग तीन दिवसांचा विकेंड यामुळे कोकणाच्या दिशेने पर्यटकांचा ओघ प्रचंड वाढला आहे. या गर्दीचा थेट परिणाम महामार्गावरील वाहतुकीवर दिसून येत असून अनेक ठिकाणी कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.माणगाव परिसरात प्रचंड ट्रॅफिक झाले आहे. बाजारपेठेतील अरुंद रस्ते, स्थानिक वर्दळ आणि महामार्गावरील वाहनांचा वाढलेला ताण यामुळे येथे वाहतूक संथ गतीने सुरू आहे. काही ठिकाणी परिस्थिती इतकी बिकट झाली की वाहनांच्या रांगा या अनेक किलोमीटरपर्यंत लागलेल्या पाहायला मिळत आहेत.

### पाणबुडीचे जलावतरण

विशाखापट्टणम : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज (शुक्रवार ३ एप्रिल २०२६) विशाखापट्टणममध्ये अणुऊर्जेवर चालणाऱ्या आयएनएस अरिदमन पाणबुडीचे आणि आयएनएस तारागिरी स्टेल्थ फ्रिगेटचे जलावतरण होणार आहे. या पार्श्र्वभूमीवर सकाळीच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी हिंदीत एक एक्स पोस्ट (द ड्रीीें ी ढ्ढशर्शी) केली आहे. 'शब्द नहीं शक्ति है अरिदमन' अशा स्वरुपाची सूचक पोस्ट संरक्षणमंत्र्यांनी केली आहे. अरिदमन हा केवळ एक शब्द नाही, ती शक्ती आहे, असे संरक्षणमंत्र्यांनी सांगितले.

### एलआयसी इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

मुंबई : दक्षिण मुंबईतील जीर्ण झालेल्या आणि मोडकळीला आलेल्या एलआयसी इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग लवकरच मोकळा होणार आहे. सातत्याने या प्रश्र्नावर आवाज उठवणाऱ्या कॅबिनेट मंत्री श्री. मंगलप्रभात लोढाजी यांच्या प्रयत्नांना यश आले असून यासंदर्भात लवकरच सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्र्वासन केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती. निर्मला सीतारामनजी यांनी दिले आहे. एलआयसी टेनंट्स अँड ऑक्युपंट्स वेल्फेअर असोसिएशनच्या मागणीचे पत्र घेऊन मंत्री लोढा यांनी गुरुवारी नवी दिल्लीत सीतारामनजी यांची भेट घेतली. यासंदर्भात त्यांनी पत्रकारांना माहिती दिली आहे.दक्षिण मुंबईतल्या विविध भागात एलआयसी आणि देना बँकेच्या अनेक जुन्या जीर्ण झालेल्या इमारती आहेत. या इमारतीतले शेकडो भाडेकरू जीव मुठीत घेऊन राहत आहेत.


### सुझुकीची नवी स्कुटर

मुंबई : जपानी वाहन निर्माता कंपनी सुझुकीने भारतात आपली नवीन बर्गमन २०२६ मॅक्सी स्कूटर लॉन्च केली आहे. या स्कूटरची सुरुवातीची किंमत १.०२ लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली असून टॉप व्हेरिएंटसाठी ग्राहकांना सुमारे १.१३ लाख रुपये मोजावे लागणार आहेत. विशेष बाब म्हणजे हे नवीन मॉडेल जुन्या बर्गमन स्ट्रीट एक्ससोबतच विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे आणि जुन्या मॉडेलच्या किंमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### नवे स्मार्ट फोन लॉन्च

मुंबई : भारतीय स्मार्टफोन बाजारात सध्या स्पर्धा अधिकच तीव्र होताना दिसत आहे. याच पार्श्र्वभूमीवर शाओमीच्या उपकंपनी रेडमी, तसेच विवो आणि रिअलमी या कंपन्यांनी आपले नवीन स्मार्टफोन लॉन्च करत ग्राहकांसाठी आकर्षक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. रेडमीने आपला नवीन रेडमी नोट १५ एसई

# जन विश्वास विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या दोन्ही सभागृहांनी जन विश्वास विधेयकाला मंजुरी दिली. राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली की अधिसूचना काढली जाईल आणि विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. हे झाले की वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यात चुका करणे हे गुन्हे ठरणार नाही.

देशात जन विश्वास हा कायदा लागू झाला की होणाऱ्या बदलाचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होईल. आता, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मुदत संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत वैध राहील, म्हणजेच किरकोळ विलंबामुळे तुमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होणार नाही. राष्ट्रीय महामार्ग अडवण्यासारख्या प्रकरणांमधील तुरुंगवासाची शिक्षा रद्द करण्यात आली असून, आता केवळ दंडाची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, आगीच्या धोक्याची खोटी सूचना देणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यास विलंब करणे किंवा विद्युत नियमांचे उल्लंघन करणे यांसारख्या प्रकरणांमधील तुरुंगवासाची शिक्षा देखील काढून टाकण्यात आली आहे. पूर्वी सौंदर्यप्रसाधनांच्या नियमांचे उल्लंघन केल्यास तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकत होती, पण आता केवळ दंड आकारला जाईल. याचा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला फायदा होईल.

विश्वासावर आधारीत प्रशासकीय आराखड्याला चालना देणे आणि नियमनांमध्ये प्रमाणबद्धता असेल याची सुनिश्चिती करण्याबद्दलची केंद्र सरकारची वचनबद्धता यातून दिसून येते. किरकोळ गुन्ह्यांना गुन्हे सूचीतून वगळून तसेच विद्यमान कायदेशीर तरतुदीमध्ये तर्कसंगतता साधत, व्यक्ती तसेच उद्योग व्यवसायांवरील अनुपालनाचा ताण कमी करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकातील तरतुदींअंतर्गत ७९ केंद्रीय कायद्यांमधील ७८४ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. व्यवसाय सुलभतेला चालना देण्यासाठी यांपैकी ७१७ तरतुदींना गुन्हे या वर्गातून वगळण्यात आले आहे. जीवन सुलभतेसाठी ६७ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या निमित्ताने केंद्र सरकारचा भर शिक्षेऐवजी सुधारणेकडे असल्याचे दिसून येत आहे. जन विश्वास विधेयकाचे राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने कायद्यात रुपांतर झाल्यानंतर सामान्य माणसाला दिलासा मिळेल आणि न्यायव्यवस्थेवरील अनावश्यक ताण कमी होईल.

## समुद्रात नाट्यमय घडामोडी
# भारतात येणारे इराणी तेलाचे जहाज अचानक चीनच्या दिशेने वळले



**तेहरान/वृत्तसंस्था :** अमेरिकेनं इराणच्या खनिज तेलावरील निर्बंध हटवल्यानंतर भारतानं या तेलाची खरेदी सुरु केली. भारतीय जहाजांना इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे इराणी तेलाच्या खरेदीचा आणि वाहतुकीचा मार्ग सुकर झाला. पण आता या सगळ्यात अचानक ट्विस्ट आला आहे. भारताच्या दिशेनं येणारा तेलाचा टँकर अचानक चीनच्या दिशेनं वळला. हा टँकर भारताच्या दिशेनं येत असल्याचं आणि ७ वर्षांनंतर इराणमधून तेलाचा सर्वात सर्वात मोठा साठा आणत असल्याचं याआधी सांगण्यात आलं होतं. पण आता हा टँकर अचानक चीनला वळला आहे.

२००२ मध्ये तयार झालेलं आणि २०२५ मध्ये अमेरिकेनं निर्बंध लादलेलं अफ्रामॅक्स जहाज पिंग शुन भारताकडे येतं होतं. पण आता हे जहाज चीनच्या डोंगयिंगला पोहोचण्याचे संकेत मिळत असल्याचं वृत्त पीटीआयनं जहाजांचं ट्रॅकिंग करणारी संस्था केप्लरच्या हवाल्यानं दिलं आहे. अफ्रामॅक्सनं या आठवड्याच्या सुरुवातीला जहाजानं पश्र्चिम किनाऱ्यावरील वडीनारला पोहोचण्याचे संकेत दिले होते. पण नंतर या जहाजानं दक्षिणकडे यू टर्न घेतला.

कमोडिटी ऍनालिटिक्स फर्म केप्लरनं दिलेल्या माहितीनुसार, इराणच्या खर्ग बेटावरुन जवळपास ६ लाख बॅरल खनिज तेल घेऊन पिंग शुन नावाचा टँकर वडीनार बंदराच्या दिशेनं येत होतं. हे जहाज ४ एप्रिलला भारतात पोहोचेल, अशी आशा होती. पण या जहाजानं अचानक मार्ग बदलल्याची माहिती समोर आली आहे. भारताकडे येत असलेलं जहाज अचानक चीनच्या दिशेनं का वळलं ते अद्याप कळू शकलेलं नाही. हे जहाज पुन्हा मार्ग बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. अमेरिकेनं इराणी तेल खरेदीवरील निर्बंध १ महिन्यासाठी हटवले आहेत.

भारतानं मे २०१९ पासून इराणकडून तेल खरेदी बंद केली. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे तेल खरेदी थांबवण्यात आली होती. २८ फेब्रुवारीपासून आखातात युद्ध सुरु झालं. महिना उलटून गेल्यावरही युद्ध सुरुच आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक रोखत दुहेरी डाव खेळला आहे. यामुळे तेलावर आधारित असलेल्या शेजारी देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या आहेत. सोबतच तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेले देशही संकटात सापडले आहेत. जागतिक तेल वाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक होर्मुझमधून चालते.

# दररोज २० भारतीय श्रमिकांचा विदेशात मृत्यू
## गेल्या पाच वर्षांच्या सरकारी आकडेवारीतील धक्कादायक वास्तव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या पाच वर्षांत दररोज सरासरी २० भारतीय श्रमिकांनी विदेशात प्राण गमावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यातील बहुतांश मृत्यू आखाती देशांत झाले आहेत, अशी माहिती परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी राज्यसभेत लेखी उत्तराद्वारे दिली.

सन २०२१ ते २०२५ या कालावधीत विदेशी भूमीवर ३७,७४० भारतीय श्रमिकांचा मृत्यू झाला, असे कीर्तीवर्धन यांनी लेखी उत्तरात नमूद केले. त्यात २०२१मध्ये सर्वाधिक ८,२३४ भारतीय श्रमिकांनी प्राण गमावले. २०२२मध्ये ६६१४, २०२३मध्ये ७२९१, २०२४मध्ये ७७४७ आणि २०२५मध्ये ७८५४ भारतीय श्रमिकांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भारतीय श्रमिकांच्या एकूण मृत्यूसंख्येत आखाती देशांतील मृतांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८६ टक्के आहे. गेल्या पाच वर्षांत संयुक्त अरब आमिरातीमध्ये १२,३८०, तर सौदी अरेबियामध्ये ११,७५७ भारतीय श्रमिकांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ कुवेत (३,८९०), ओमान (२,८२१), मलेशिया (१,९१५) आणि कतार (१,७६०) या देशांत मृत्यू झाल्याचे सरकारच्या आकडेवारीवरून दिसून येते.

याआधी माहिती अधिकारातून मिळालेली माहिती आणि 'कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स एनिशिएटिव्ह' ने अधोरेखित केलेल्या संसदेतील तपशीलानुसार, २०१२ ते २०१८ या कालावधीत आखाती देशांमध्ये दररोज १० भारतीय श्रमिकांनी प्राण गमावले.

गेल्या पाच वर्षांत विदेशात छळ, शोषण आणि कामाच्या ठिकाणी गैरप्रकाराबाबत भारतीय नागरिकांकडून भारताच्या संबंधित देशांतील दूतावासांमध्ये ८०,९८५ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातील सर्वाधिक १६,९६५ तक्रारी संयुक्त अरब अमिरातीतील आहेत.

# तरुण भारत असोसिएटस्च्या 'विकासपुरुष' विशेषांकाचे थाटात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई , दि. ०३ एप्रिल :** क्रेंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी मागील अकरा वर्षात केलेल्या विकासकामांचा आढावा घेणारा ''विकासपुरुष'' हा विशेषांक तरुण भारत असोसिएटस् तर्फे तयार करण्यात आला आहे. श्या विशेषांकाचे प्रकाशन एका छोटेखानी समारंभात श्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते थाटात करण्यात आले, या विशेषांकासाठी तरुण भारत असोसिएटस्चे प्रबंध संचालक श्री. रवींद्र दाणी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी तरुण भारत असोसिएटस्चे सीईओ मनोज मुळे, व्यवस्थापक महेंद्र बांगरे, महाव्यवस्थापक ओम ढाकुलकर, व्यवस्थापक राजेश व्यवहारे उपस्थित होते. तरुण भारत असोसिएटस्ने एक उत्तम आणि



परिपुर्ण अंक प्रसिघ्द केला आहे. अशा शब्दात क्रेंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या विशेषांकाची प्रशंसा केली.

नितीन गडकरी हे विकासाशी जोडलेले एक सुपरिचित असे मंत्री म्हणुन काम करताना स्वकर्तृत्वाने आकारास आलेले प्रभावी व्यक्तिमत्व. नितीन गडकरी हे नाव कानी पडताच एक जिंदादिल, दिलदार, कार्यक्षम, धाडसी, समर्पित, जिद्दी, परिश्रमी असे व्यक्तिमत्व समोर उभे राहते. कोणतेही काम अगदी मनापासून व निष्ठेने करणारा नेता, अशी ओळख त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण देशाला करुन दिली आहे. गडकरी हे राजकारण्यांसाठी 'समाजकारणाचे' आदर्श आहेत. देशाला आणि जनतेला आजवर जे माहित नव्हते, असे काम करण्यात गडकरी यांना विशेष रुची असते. त्यांच्या डोक्यात एकाच वेळी अंसख्य विचार सुरु असतात. नुसते रस्ते तयार केले, पुल बांधले म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे ते मानत नाहीत, त्याही पलीकडे समाजाचा एक घटक म्हणून आपली आणखी जबाबदारी आहे आणी ती पार पाडली पाहीजे, यासाठी ते सतत कार्यशिल असतात.

''विकासपुरुष'' या विशेषांकात रस्ते बाधंणी, परिवहन विकास, विकासाचे नवनवे पैलू यांचीही चर्चा करण्यात आली आहे. या अंकात काही मान्यवरांनी विकासाची चर्चा करीत असतानाच नितीन गडकरी यांनी याबाबत केलेल्या कामाचे कौतुक करणारे लेखही लिहीले आहेत. त्यात गडकरी यांची विकासाची दृष्टी, त्यांचा कामाचा झपाटा, निर्णयक्षमता यांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

# शिवरायांच्या स्वराज्य संकल्पनेतून नव्या पिढीला ऊर्जा व दिशा मिळेल - डॉ. नीलम गोऱ्हे

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई , दि. ०३ एप्रिल :** स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४६ व्या पुण्यतिथीनिमित्त मुंबईतील विधानभवन परिसरात त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. यावेळी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना



आजही अत्यंत प्रेरणादायी आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांना शक्ती व बळ मिळावे, तसेच तुळजाभवानीचे आशीर्वाद लाभावेत, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

विधानमंडळात थोर विभूतींच्या जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्याची परंपरा सातत्याने जपली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तींच्या कार्याची आठवण करून देणारे हे क्षण समाजाला नवी दिशा देणारे ठरतात, असे त्या म्हणाल्या.

यावेळी विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे, जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने, खासगी सचिव अविनाश रणखांब, विशेष कार्यकारी अधिकारी संतोष उडतेवार तसेच विधिमंडळ कर्मचारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे पुण्यस्मरण महाराष्ट्रासह देश-विदेशात मोठ्या प्रमाणात होत असून, त्यांच्या कार्यातून पुढील पिढ्यांना प्रेरणा, ऊर्जा आणि स्फूर्ती मिळत राहील, असा विश्वासही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

# मारहाण प्रकरणी संताप ; जेहुरमध्ये पुतळा जाळून गाव बंद

**तभा वृत्तसेवा**
**कन्नड , दि. ०३ एप्रिल :** तालुक्यातील मुंगसापूर (जेहुर) येथील ब्रम्हश्री जनार्दन स्वामी आश्रम परिसरात पपई विक्रीच्या कारणावरून एका शेतकऱ्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ दि. ०२ एप्रिल रोजी जेहुर गावकऱ्यांनी गाव बंद ठेवत तीव्र निषेध नोंदविला.

मिळालेल्या माहितीनुसार, बबन जयवंतराव पवार (वय ५९, रा. जेहुर) हे शेतकरी आश्रम परिसरात पपई विक्री करत असताना त्यांच्याशी वाद झाला. वाद वाढल्यानंतर त्यांना जबरदस्तीने आश्रमात नेऊन लाकडी वस्तूंनी मारहाण करण्यात आली. तसेच जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, मारहाण झालेले शेतकरी हे गावाचे माजी उपसरपंच असल्याचेही स्पष्ट झाले असून, या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

घटनेच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी दि. ०२ एप्रिल रोजी गाव बंद ठेवत रस्त्यावर उतरून आंदोलन केले. यावेळी संतप्त ग्रामस्थांनी संबंधित बाबाचा प्रतीकात्मक पुतळा तयार करून त्याचे दहन करत निषेध व्यक्त केला. शेतकऱ्यावर हात उचलणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांनी केली. काही



काळ परिसरात तणावपूर्ण शांतता होती.

या प्रकरणी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# स्थापना दिनानिमित्त ५१ लाख घरांवर फडकणार भाजपचा झेंडा

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई , दि. ०३ एप्रिल :** भाजपच्या स्थापना दिनानिमित्त दि. ५ ते १२ एप्रिल याकाळात रोजी राज्यभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन होणार असून, ६ एप्रिलला ५१ लाख घरांवर भाजपचा झेंडा फडकावला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते, मंत्री या कार्यक्रमात सहभागी होतील, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी दिली.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. स्थापना दिनानिमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह राज्यातील सर्व मंत्री, अन्य लोकप्रतिनिधी जनतेशी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. या निमिताने राष्ट्रवादी विचारांचा उत्सव साजरा होईल, असेही उपाध्ये यांनी नमूद केले.

दि. ६ एप्रिल रोजी भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन आहे. या निमित्त २८८ विधानसभा मतदारसंघात, ३६ जिल्ह्यात आणि राज्यातील १ लाख बुथवर स्थापना दिनाचे कार्यक्रम होणार आहेत. प्रत्येक बुथवर वॉल पेंटिंग, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार, सक्रीय कार्यकर्त्यांचे मेळावे, समाजातील नामवंत व्यक्तींशी संपर्क, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांशी संपर्क असे कार्यक्रम होणार आहेत. वॉल पेंटिंग मध्ये प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख नेते आपापल्या मतदारसंघात वॉल पेंटिंग मध्ये सहभागी होणार आहेत. त्याबरोबरच केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती घरोघरी पोहचवण्यात येणार आहे. पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते आपल्या घरावर पक्षाचा झेंडा फडकवणार आहेत.

यंदा ६ एप्रिल रोजी राज्यातील ५१ लाख घरांवर भाजपचा झेंडा फडकावला जाईल. तसेच पक्षाच्या आजवरच्या वाटचालीनिमित्त तयार करण्यात आलेला माहितीपट दाखविण्यात येणार आहे. दोन खासदारांपासून जगातील सर्वात मोठ्या पक्षापर्यंतचा भारतीय जनता पार्टीचा प्रवास यातून उलगडला जाणार आहे. पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील १ हजार २०० मंडलांमध्ये हे कार्यक्रम होणार आहेत. या बरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व अन्य प्रमुख नेते, मंत्री ६ व ७ एप्रिल रोजी पक्ष कार्यकर्ते व जनतेशी संवाद साधतील. सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम होईल. गाव चलो, वस्ती चलो या कार्यक्रमांतून पक्षाचे पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते जनसंपर्क अभियान राबविणार आहेत, अशी माहिती केशव उपाध्ये यांनी दिली.



लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, लातूरच्या थ्रो बॉल संघाची राज्यस्तरावर धडक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'विभागीय शालेय थ्रो बॉल स्पर्धा २०२५-२६' मध्ये लातूरच्या श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक, तर १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे. नांदेड येथे पार पडलेल्या या अटीतटीच्या सामन्यांमध्ये विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट ताळमेळ आणि चिकाटीचे प्रदर्शन केले. विशेषतः १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रतिस्पर्धी धाराशिव संघांना पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशामुळे श्री श्री रविशंकर विद्यामंदिर आणि लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विजयी खेळाडूंची नावे: १. संस्कृती शिवराम मलवाडे (संघनायक) २. अपूर्वा महेश गडगडे (उपसंघनायक) ३. श्रुती गोविंद कुंभार ४. वसुंधरा तानाजी सोनवणे ५. सायली दत्तात्रय धारेकर ६. श्रावणी प्रदीप पंडित ७. अन्वी विनोद डोंगरे ८. श्रावणी लिंबराज चिवडे ९. स्वरा राहुल चव्हाण १०. समृद्धी बालाजी गायकवाड ११. सिद्धी श्रीकृष्ण गडदे १२. हर्षदा चंद्रकांत मोरे विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी केल्यानंतर, आता हे १९ वर्षाखालील संघ राज्यस्तरीय थ्रो बॉल स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. ही राज्यस्तरीय स्पर्धा ७ एप्रिल रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतही आपले खेळाडू लातूरचे नाव उंचावतील, असा विश्वास क्रीडा शिक्षकांनी व्यक्त केला आहे.



# मनपा प्रशासनावर पदाधिकाऱ्यांची पकड मजबूत होणार तरी केव्हा ?

- शहराच्या विविध भागातील नाल्या वर्षानुवर्षे तुंबून असल्याने दुर्गंधीचे साम्राज्य
- स्वच्छता विभागाच्या कामांकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** प्रदीर्घ कालखंडानंतर लातूर शहर महानगरपालिकेला हक्काचे पदाधिकारी मिळाले आहेत. त्यामुळे मागच्या अडीच वर्षांहून अधिक काळचा प्रशासकीय कारभार संपुष्टात आला आहे. तरीही अद्याप मनपा प्रशासनावर पदाधिकाऱ्यांची पकड मजबूत झाल्याचे दिसून येत नाही. मनपातील अनेक अधिकारी - कर्मचारी जणू प्रशासकराजच्या मानसिकतेतून बाहेर आल्याचे जाणवत नाही. त्यामुळे प्रशासनावर आपली मजबूत पकड ठेवण्याच्या दृष्टीने पदाधिकाऱ्यांनी कंबर कसावी,अशी अपेक्षा सामान्य नागरिक बाळगून आहेत.शहराच्या अनेक भागात वर्षांपासून उभारण्यातक आलेल्या मोठमोठ्या नाल्या वर्षानुवर्षे साचलेल्या कचऱ्याने तुंबून असल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरल्याचे निदर्शनास येते. नूतन पदाधिकाऱ्यांनी याकरिता स्वच्छता विभागाच्या कामांकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट जाणवते.

लातूर शहर मराठवाड्यातील सर्वात वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणून ओळखले जाते. लातूरला शिक्षणाची पंढरी म्हणूनही संबोधले जाते. शिक्षणासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लातूरकडे येणारा विद्यार्थ्यांचा लोंढा खूप मोठा आहे. त्यामुळे लातूरच्या अर्थकारणात खाजगी शिकवणी वर्गांचाही महत्वपूर्ण वाटा आहे. वाढत्या खाजगी शिकवणी वर्गांमुळे व्यवसायाच्या अनेक संधीही येथे निर्माण झाल्याचे पाहावयास मिळते. लातूरचे जेवढे स्थानिक नागरिक आहेत, त्यांच्या तुलनेत निम्म्यांहून अधिक मंडळी शिक्षणाच्या अनुषंगाने याठिकाणी वास्तव्यास असल्याचे पाहायला मिळते. लातूर शहर मनपाची तिसरी सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवून मनपावर आपला ताबा मिळवला आहे. निवडणुकीपूर्वी अडीच वर्षांहून अधिक काळ मनपात प्रशासकराज होते. प्रशासक असल्याने कितीही नाही म्हटले तरी मनपा कर्मचाऱ्यांवर कोणाचा फारसा वचक नसल्याचे जाणवत होते. मनपाच्या अनेक विभागातील अधिकारी - कर्मचारी मनमानीपणे वागत असलेले पाहायला मिळत असे. त्याचा परिणाम अर्थातच मागच्या काळात कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमेतवर, कामावर झाल्याचे पदोपदी जाणवत असे.

मनपा पदाधिकाऱ्यांनी आता मनपाच्या कारभाराची सूत्रे आपल्या हातात घेतली आहेत. नूतन महापौर आणि उपमहापौर मनपात पहिल्यांदाच निवडून आलेले आहेत. त्यामुळे त्यांना प्रशासनावर पकड निर्माण करताना विशेष कसब दाखवून द्यावे लागणार आहे. हे दोन पदाधिकारी जरी मनपात नवे असले तरी अनेक जुने जाणते नगरसेवक निवडून आलेले असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाने नूतन पदाधिकारी अल्पावधीत पुरते तयार होऊ शकतात, ही बाबही खरी आहे. मनपाच्या सर्व विभागात सुसूत्रता आणण्यासाठी नूतन कारभाऱ्यांना आणखी बराच वेळ द्यावा लागणार आहे, हे खरे आहे. जुन्यांनी त्यांना वेळेत तयार केले तर मात्र फारसा विलंब लागणार नाही. जुन्या अनुभवी नगरसेवकांनी नव्या चेहऱ्याना मनपाची कार्यपद्धती शिकविण्यास फारसी उत्सुकता नाही दाखवल्यास मात्र नवख्याना शिकण्यासाठी बराच वेळ लागू शकतो. आ. अमित देशमुख यांनी जर जुन्या, अनुभवी चेहऱ्यांना नवीन नगरसेवकांना शिकवण देण्याच्या सूचना केल्यास हे काम लवकरही होऊ शकते. मनपावर आ. अमित देशमुख यांचेच निर्विवाद वर्चस्व असल्याने ही बाब सहज साध्य होऊ शकते.

लातूर शहराच्या अनेक विस्तारित भागात मोठमोठ्या नाल्या उभारण्यात आल्या आहेत. या नाल्यामध्ये वर्षानुवर्षे घाण, कचरा साचून राहिला आहे. किमान चार फुटापेक्षा जास्त खोल; असलेल्या या नाल्या फक्त घाणीने भरून ओसंडून वाहताना दिसतात. पावसाळ्यात तर या नाल्यातील सगळी घाण रस्त्यावर येते. त्यामुळे या नाल्या कचरा साचविण्यासाठी केल्यात की काय ? असा प्रश्नही नागरिकांना कायम पडताना दिसतोय. महानगरपालिकेत स्वच्छता विभाग कार्यरत आहेत. या स्वच्छता विभागात शेकडो स्वच्छता कर्मचारीही आहेत. वर्षानुवर्षे



या नाल्या साफ केल्या जात नसतील तर हे स्वच्छता कर्मचारी मनपाकडून नेमका पगार घेतात तरी कोणत्या कामाचा ? असा प्रतिप्रश्न उपस्थित केला गेला तर त्यात वावगे ते काय ? मनपात मागच्या काळात प्रशासकराज असताना अशा अनेक गोष्टींकडे संबंधितांकडून कानाडोळा केला गेला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. आता मात्र मनपाच्या केवळ स्वच्छता विभागाच्याच नव्हे तर सर्वच विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचे , त्यांच्याकडून कामे करून घेण्याचे काम नूतन पदाधिकाऱ्यांना करावे लागणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पदाधिकाऱ्यांनी स्वच्छता विभागाच्या कामांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे,अशी अपेक्षा लातूरकर बाळगून आहेत.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची व्यापक बैठक संपन्न

## कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाचे नियोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** लातूर शहरात दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच उत्सव शांततामय, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाकडून पूर्वतयारीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मीटिंग हॉलमध्ये शांतता समितीची सविस्तर बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे, तसेच लातूर शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आणि इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रम, मिरवणुका, सांस्कृतिक उपक्रम आणि सार्वजनिक सहभाग लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षात्मक व प्रशासकीय उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. मिरवणुकीचे मार्ग निश्र्चित करणे, संवेदनशील ठिकाणांची ओळख करून त्या ठिकाणी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करणे, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांची आखणी करणे, तसेच ध्वनीप्रदूषण नियंत्रणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करणे यावर विशेष भर देण्यात आला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नमूद केले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती हा समाजातील सर्व घटकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानाचा उत्सव असून तो शांततेत व कायद्याच्या चौकटीत राहून साजरा करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारच्या अफवा, गैरसमज किंवा अनुचित घटनांना थारा न देता नागरिकांनी पोलीस प्रशासनाशी समन्वय राखावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. मिरवणुकी दरम्यान कोणतेही जयंती मंडळ ध्वनी मर्यादा ओलांडणार नाही याची काळजी घेतील. जे कोणी मिरवणुकीत ध्वनीची मर्यादा ओलांडतील अशा जयंती मंडळाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच मोटरसायकल रॅली न काढता पायी रॅली काढण्यात यावी असेही आवाहन करण्यात आले.

अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी देखील उपस्थितांना सूचित केले की, उत्सवादरम्यान सामाजिक सलोखा अबाधित ठेवणे अत्यंत आवश्यक असून कोणत्याही प्रकारचा वाद टाळण्यासाठी संयम व शिस्त राखावी. तसेच आयोजकांनी मिरवणूक वेळेत पूर्ण करावी, ध्वनी मर्यादा पाळाव्यात आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे त्यांनी सांगितले. या बैठकीस शहरातील विविध भागांतील उत्सव समित्यांचे पदाधिकारी, मान्यवर नागरिक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाभळगावच्या ग्रामीण रुग्णालयात कुटुंब नियोजन शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन बालकुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेले बिनटाका कुटुंब नियोजन शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ४१ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

सदर शिबीर दि. ३१ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात लॅप्रोसकोपी सर्जन डॉ. खरे यांनी या शस्त्रक्रिया केल्या. याकामी त्यांना ग्रामीण रुग्णालय बाभळगाव येथील डॉ.शिंदे, डॉ. पटवे मॅडम, डॉ. कोटेचा, तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ सगीरा पठाण मॅडम, ग्रामीण रुग्णालय बाभळगाव येथील आयुष वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच अधीपरीचारिका श्रीमती बिराजदार सिस्टर, पटवाडे सिस्टर,कांबळे सिस्टर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्षकिरण तंत्रज्ञ या सर्वांनी शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

## पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, हवालदार नागरगोजे ४५ हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपतच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी व पोलीस हवालदार राहुल नागरगोजे यांना दाखल गुन्ह्यातील व्यक्तीला अटक न करण्यासाठी ४५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. लाचलुचपतच्या या कारवाईने नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच पोलीस खात्यावर संक्रांत आल्याच्या चर्चेने वेग घेतला आहे.

यासंदर्भात लातूरचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक संतोष बर्गे यांच्याकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दि. ३१ मार्च २०२६ रोजी तक्रारदारांचे मेहुणे रणजित मल्हारी पाटील यांचे विरुद्ध गु.र.नं . १६२/ २०२६ कलम ७६, ३५१ (२), ३५२ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद आहे. या गुन्ह्यात पाटील यांना अटक न करण्यासाठी तसेच इतर मदत करण्याच्या नावाखाली पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी व पोलीस हवालदार राहुल नागरगोजे यांनी तीन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार करण्यात आली होती. सदर लाच प्रकरणाची पडताळणी केली असता हवालदार नागरगोजे यांनी पोलीस निरीक्षक पुजारी यांच्या सांगण्यावरून पंचासमक्ष पन्नास हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाचलुचपतच्या पथकाने या दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांना पकडण्यासाठी दि. २ एप्रिल २०२६ रोजी उदगीरच्या हॉटेल पंचवटी येथे सापळा लावला होता. या सापळ्यात हवालदार नागरगोजे ४५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना सापळ्यात अडकला. लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर त्याने पुजारी याना तक्रादारांच्या समक्ष फोन करून पैसे मिळाल्याची माहिती दिली. लाचलुचपतच्या अधिकाऱ्यांनी पुजारी व नागरगोजे यांना तात्काळ ताब्यात घेतले आहेत. त्या दोघांचे मोबाईलही चौकशीच्या अनुषंगाने ताब्यात घेण्यात आले आहेत. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास तपास अधिकारी लाचलुचपतचे पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे करत आहेत.

## दयानंद कला महाविद्यालयात २२ संशोधक विद्यार्थ्यांची पीएच.डी. पूर्व मौखिकी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** दयानंद कला महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयाचे संशोधन केंद्र असून सन १९९९ पासून या केंद्रात विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. शै. व. २०२५-२६ मध्ये एकूण १२६ विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. यामध्ये सुमारे १४ विद्यार्थी महाराष्ट्र आणि केंद्र शासनाच्या विविध योजनेतून अधिवास छात्रवृत्ती दिली जाते. २२ विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करण्यात आले होते. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधनाचा अंतिम प्रारुप आराखडा सादर केला. यामध्ये इंग्रजी विषयाचे १०, हिंदी विषयाचे ०९ आणि मराठी विषयाचे ०३ संशोधक विद्यार्थी होते. एकाच दिवशी एवढ्या विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करणे ही महाराष्ट्रातील एकमेवाद्वितीय घटना आहे. महाविद्यालयातील संशोधन केंद्र अंत्यत प्रगत असून महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सुमारे एक लाख विस हजार ग्रंथ संख्या आहे. या ग्रंथसंख्येचा लाभ नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे संशोधक विद्यार्थी घेत आहेत. २२ विद्यार्थ्यांपैकी तीन अधिवास छात्रवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्व मौखिकी सादर केली. या विद्यार्थ्यांना शासनाकडून संशोधन कार्य पूर्ण होई पर्यंत सुमारे ४०,०००००/- (अक्षरी रु. चाळीस लाख फक्त) अधिवास शिष्यवृत्ती दिली जाते. महिन्याला सुमारे ३७ ते ४५ हजार शिष्यवृत्ती दिली जाते. पीएच.डी. पूर्व मौखिकीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाकडून १३ लाख रुपयांचा गुटखा व मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ एप्रिल :** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाविरुद्ध व्यापक मोहीम उघडली होती. या मोहिमेअंतर्गत एका मारुती एर्टिगा वाहनामधून घेऊन जाणारा ६ लाख २४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व वाहन असा एकूण १३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस उपमहानिरीक्षकांच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वाढवणा पोलीस ठाणे हद्दीतील डावूळ गावाजवळ सदरची एर्टिगा थांबवली असता, सदर वाहनात विक्री करण्यासाठी घेवून जात असलेला गुटखा मिळून आला. या प्रकरणी आरोपी फय्युम अब्दुल रऊफ शेख, निसार गफ्फार



विस्ती, मौजन आजम सय्यद यांच्या विरोधात वाढवणा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस ठाणे वाढवणा येथील पोउपनि हालसे हे करीत आहेत.

गुटखा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जसे, स्वादिष्ट,सुगंधित तंबाखू, अपमिश्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट,सुगंधित सुपारी, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येते. सदर कलमाप्रमाणे केलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा पर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकों प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोका / गणेश धुमाळ व पोकों/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. मागील काही दिवसांपासून सदर पथकाने अवैध व्यवसायांच्या विरुद्ध उल्लेखनीय व धाडसी कामगिरी केली असून, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

खबर हेल्पलाइन चा वापर करा अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांकडे पोहोचाविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली खबर नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# डॉ. लाड यांचा शब्द खरा; भगतसिंग नगरमध्ये मंदिर-उद्यानाचे भूमिपूजन

**मानवत,/प्रतिनिधी** - शहराच्या विकासाला वेग देत दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरवण्याची परंपरा कायम ठेवत उपनगराध्यक्ष डॉ. अंकुश लाड यांच्या हस्ते प्रभाग क्रमांक १ मधील भगतसिंग नगर येथे हनुमान जयंतीच्या शुभ मुहूर्तावर मारुती (हनुमान) मंदिर व भव्य उद्यानाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांच्या दीर्घकाळच्या मागणीला अखेर मूर्त रूप मिळाले आहे.

भगतसिंग नगरमधील मंदिर व उद्यान उभारणीची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. निवडणूक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत डॉ. अंकुश लाड यांनी स्वतः पुढाकार घेऊन हा प्रकल्प मार्गी लावला, त्यामुळे स्थानिक नागरिकांनी त्यांचे विशेष आभार मानले.

या कार्यक्रमाला प्रभागाचे नगरसेवक राजकुमार खरात व राजेश वासुंबे यांच्यासह संजयजी बांगड, दत्तप्रसादजी बांगड, ॲड. अनिरुद्ध पांडे, मोहनराव लाड, दत्तराव चौधरी, किशोर लाड, विनोद रहाटे, ॲड. गणेश मोरे, स्वप्नील शिंदे, गणेश वासुंबे, सत्यशिल धबडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नागरिकांच्या स्वप्नांना मिळाले प्रत्यक्ष रूप

या ठिकाणी उभारण्यात येणारे मारुती मंदिर हे धार्मिक श्रद्धेचे केंद्र ठरणार असून, सोबतच विकसित होणारे भव्य उद्यान परिसरात हरित वातावरण निर्माण करून नागरिकांना विरंगुळ्याचे आधुनिक ठिकाण उपलब्ध करून देणार आहे. डॉ. लाड यांच्या पुढाकारामुळे हा संपूर्ण परिसर विकासाच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे.

पुढील विकासकामांची ठोस घोषणा

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना डॉ. अंकुश लाड यांनी स्पष्ट केले की, भगतसिंग नगरला मुख्य रस्त्याशी जोडणारा डी.पी. प्लॅनमधील रस्ता लवकरच पूर्ण केला जाणार आहे. तसेच या भागातील दुसऱ्या ओपन स्पेसमध्ये बुद्ध विहार व आणखी एक उद्यान उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

''दिलेलं आश्वासन पूर्ण केल्याशिवाय थांबणार नाही''

नागरिकांच्या सत्काराला उत्तर देताना डॉ. लाड म्हणाले, ''शहराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे. निवडणुकीत दिलेली प्रत्येक आश्वासने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. जनतेने दिलेला विश्वास माझ्यासाठी प्रेरणा आहे. काम करत आलोय, आणि पुढेही काम करत राहणार आहे.''

नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



या कार्यक्रमाला राम कष्टे, सतीश मगर, नितीन मगर, नारायण गिरी, मुंजा कदम, मौली कदम, दत्ता बंडेवाड, भरत ढाले, प्रकाश ढाले, अशोक ढाले, असद खान, वाजेद शेख, समाधान साळवे, अमोल मगर, राजू चव्हाण, नितीन घनसावंत, प्रवीण मगर, विष्णू हरणे, नामदेव खताळे, गजानन बंडेवाड, रत्नदीप बोराडे, बाबासाहेब बोराडे, सुलतान भाई कुरेशी, श्रवण गायकवाड, सोनू अवचार आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच, डॉ. अंकुश लाड यांच्या नेतृत्वाखाली भगतसिंग नगरमध्ये सुरू झालेला हा प्रकल्प केवळ एक विकासकाम नसून, नागरिकांच्या विश्वासाची पूर्तता आणि शहराच्या प्रगतीची नवी दिशा ठरत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मार्च एन्ड : सुट्टीच्या दिवशीही कार्यालय पूर्णवेळ सुरु ठेवा : रजा देऊ नका : जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा आदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेंतर्गत विविध विकास कामांवरील खर्च मार्च एन्ड अखेरपर्यंत पूर्ण व्हावा, या दृष्टीने संबंधित विभागांनी मार्च या महिन्या अखेरपर्यंत सुट्टीच्या दिवशीसुध्दा कार्यालय पूर्णवेळ सुरुच ठेवावे व अधिकारी कर्मचारी यांच्या रजा मंजूर करु नयेत, असे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नितीशा माथूर यांनी दिले आहेत.

जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामे विहित वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने सर्व विभागांनी योग्य ती काळजी घ्यावी. शासनाने ठरवून दिलेल्या निकशा प्रमाणे विहित कालमर्यादेत विकास कामे पूर्ण करण्याकरीता विकास कामांवरील खर्च ३१ मार्च २०२६ अखेर पूर्ण करावा, असे स्पष्ट निर्देश श्रीमती माथूर यांनी दिले असून या मार्च महिन्यात संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या रजा मंजूर करु नयेत, कोणत्याही विभाग प्रमुखांनी मुख्यालय सोडू नये, ३१ मार्च २०२६ अखेर विकास कामांच्या संचिका वेळेवर सादर कराव्यात, दायित्व निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी, प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देशही दिले आहेत.

### व्यापाऱ्याची २८ लाखाची फसवणूक केल्याबद्दल एकाविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील नवा मोंढा भागातील एका आडत व्यापाऱ्याची सुमारे २८ लाख रुपयांची फसवणूक केल्याबद्दल कोतवाली पोलिसांनी एका दलाला विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मोंढ्यातील न्यानसिंह ट्रेडिंग कंपनी याचे संचालक भारत मुक्तावार हे आपल्या मुलासह शेतकऱ्यांकडून सोयाबीन, तूर, हरभरा आदी शेतमाल खरेदी करत व पुढे विक्री करीत, २०२१ पासून महेश डावरे नामक व्यक्तीबरोबर तूर खरेदीचा व्यवहार सुरु केला. २ ऑक्टोंबर २०२५ रोजी डावरे यांनी मुक्तावार यांच्या दुकानातून ठरलेल्या दराप्रमाणे सुमारे ८०० क्विंटल तूर उचलला. ५२ लाख ७३ हजार ८०० रुपये एवढी त्या मालाची किंमत होत. त्यापैकी २४ लाख रुपये डावरे यांनी त्या व्यापाऱ्यास अदा केले. परंतु, उर्वरित २८ लाख ७३ हजार ८०० रुपये आठ दिवसात देतो, असे आश्वासन देऊन सुध्दा संबंधिताने ती रक्कम अदा केली नाही. त्यामुळे मुक्तावर यांनी कोतवाली पोलिस ठाणे गाठून महेश डावरे याच्या विरोधात फसवणूकीची तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे.

### महापालिकेंतर्गत बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त केलेल्या ५० वर कर्मचाऱ्यांचे वेतन संबंधित एजन्सीद्वारे गुडूप : कर्मचारी वाऱ्यावर

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेंतर्गत विविध विभागात विविध पदांवर बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त केलेल्या सुमारे ५० वर कर्मचाऱ्यांचे मार्च २०२४ पासून तब्बल १५ महिन्यांचे थकलेले वेतन वितरित करण्याबाबत एका मल्टि सर्व्हिसेस कंपनीच्या व्यवस्थापनाने चक्क हात वर केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

महानगरपालिकेंतर्गत विविध विभागांमध्ये विविध पदांवर बाह्य यंत्रणेमार्फत एका अधिकाऱ्याने मल्टि सर्व्हिसेस कंपनीबरोबर चर्चा करीत सुमारे ५० वर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. यात प्रामुख्याने फायरमन, विद्युत विभागातील कर्मचारी, पंप ऑपरेटर, वाहन चालक, लिपीक व इतर सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या कर्मचाऱ्यांनी महापालिकेंतर्गत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे कर्तव्य बजावले. परंतु, या कर्मचाऱ्यांना मार्च २०२४ पासून संबंधित एजन्सीने वेतन दिले नाही. या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांनी त्या मल्टि सर्व्हिसेस कंपनीच्या व्यवस्थापनाकडे निवेदने दिली. थकीत वेतनापैकी किमान ३ वेतन ३१ जानेवारी २०२५ पर्यंत अदा करावे, असे म्हटले. परंतु, संबंधित व्यवस्थापनाने त्याकडे तर ढूंकूनही पाहिले नाही. पुढे या कर्मचाऱ्यांनी इशारा दिल्यानंतरसुध्दा एकूण १५ महिन्यांचे थकीत वेतनही मार्च २०२६ अखेरपर्यंत अदा केले नाही. त्यामुळे बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त केलेल्या या कर्मचाऱ्यांनी आता संबंधित एजन्सीधारकाने चक्क हात वर केल्याने वेतनाबाबतच्या अपेक्षाच सोडून दिल्या आहेत.

### नांदेड परिक्षेत्रात गुटखा विरोधी मोहिम; ६० आरोपी गजाआड, ६० लाखांचा मुद्देमाल जप्त : परभणीत १३ आरोपी गजाआड

**परभणी,/प्रतिनिधी :** नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरोधात पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई करण्यात आली असून अवघ्या दहा दिवसांत ५६ गुन्हे दाखल करत ६० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सुमारे ६० लाख २१ हजार १८९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली १६ मार्च ते २५ मार्च २०२६ या कालावधीत ही मोहीम राबविण्यात आली. कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली.
या मोहिमेत नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यांत एकूण २०१० दुकाने व पानटपऱ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ५६ गुन्हे नोंदवून ६० आरोपींना अटक करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात विविध कंपन्यांचा गुटखा, सुगंधित तंबाखू व संबंधित साहित्याचा समावेश असून एकूण किंमत ६०,२१,१८९ रुपये इतकी आहे.

दरम्यान, या कारवाईदरम्यान अवैध गुटखा, सुगंधित तंबाखू, पानमसाला, मावा आदी पदार्थांच्या साठवणूक, वितरण व वाहतुकीवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. या गुन्ह्यांमध्ये न्यायालयीन सुनावणीदरम्यान दोषी आढळल्यास कारावासासह दंडाची तरतूद आहे.

'खबर' हेल्पलाईन सुरू...

अवैध व्यवसायांविषयी माहिती मिळावी यासाठी पोलीस विभागाने 'खबर' हेल्पलाईन सुरू केली असून नागरिकांनी ९१ ५० १०० १०० या क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

### इसाद येथे निराधार महिलेला शिलाई मशीनची मदत

**परभणी,/प्रतिनिधी :** होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च ॲन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेच्या वतीने इसाद (ता. गंगाखेड) येथील निराधार महिला संगीता दिलीप गरुड यांना उदरनिर्वाहासाठी 'फॉल-पिको शिलाई मशीन' भेट देण्यात आली.

या प्रसंगी एचएआरसी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन सत्यनारायण चांडक, डॉ. दिनेश भुतडा, डॉ. श्रीनिवास केशट्टी (उपप्राचार्य, शिवाजी महाविद्यालय), डॉ. शैलेश कदम, उपसरपंच नितीन भोसले, राहुल सातपुते तसेच जिल्हा परिषद शिक्षक चंद्रकांत भोसले आदी उपस्थित होते.

## प्रभावती नगरातील रक्तदान शिबिरास प्रतिसाद : हनुमान जन्मोत्सवानिमित्त उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी:** हनुमान जन्मोत्सवाच्या पावन निमित्ताने शहरातील प्रभावती नगरात आयोजित रक्तदान शिबिरास भाविक भक्त व महिला भक्तांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रभावती नगरात सकाळी ६ वाजता श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. त्यानंतर सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत युवक, महिला तसेच सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात रक्तदान करून मानवतेची सेवा केली. याचबरोबर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय सहभागी होत समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. या यशस्वी उपक्रमासाठी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक तसेच सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे श्री हनुमान मंदिर कमिटी, प्रभावती नगर, परभणी यांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## महाराष्ट्र कास्ट्राईब आरोग्य कर्मचारी संघटनेच्या नव्या संघाची रचना

**मानवत,/प्रतिनिधी-** आज दि २९/०३/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची सभा बुलढाणा स्थित जिजामाता महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली.महासंघाचे माजी अध्यक्ष दिवंगत ॲड.प्रा.व्हि.के.क्षीरसागर यांच्या १६ व्या स्मृती दिनाच्या औचित्याने आयोजित केलेल्या या सभेच्या अध्यक्षस्थान बैठकीत महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष मा. राजेंद्र कुमार खाजेकर साहेब तर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय महासचिव मा. बापूसाहेब ससाणे साहेब, केंद्रीय मुख्य संगठन सचिव मा.विजय क्षीरसागर नियोजित केंद्रीय उपमहासचिव श्रीम. अस्मिता क्षीरसागर मॅडम, केंद्रीय कोषाध्यक्ष तुकाराम रोकडे,जेष्ठ उपाध्यक्ष निवृत्ती सरकटे, कास्ट्राईब राज्य पर्यवेक्षिका संघाच्या अध्यक्षा



अंजली देशमुख यांच्या हस्ते या बैठकीत महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब आरोग्य कर्मचारी संघ या कास्ट्राईबच्या नव्या संघाची रचना करुन या संघाच्या राज्य अध्यक्ष पदी श्री दत्तात्रय साहेबराव कौटकर, (आरोग्य विभाग परभणी) यांची निवड करून नियुक्त आदेश देण्यात आले .
या वेळी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातून आलेले पदाधीकारी उपस्थित होते.
तसेच परभणी जिल्ह्यातील श्री विजयकुमार ढगे,(जिंतूर ) श्री सुरेश जाधव (जिंतूर )व श्री विनोद येसके,(मानवत ) हे ही आवर्जून उपस्थित होते. या निवडीबद्दल उपस्थित सर्वांनी व मित्रपरिवाराने कौटकर यांचें अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिंतूर सय्यद अहेमद खान उर्दू प्रा. शाळेत ''स्वयंशासन दिन'' व निरोप समारंभ उत्साहात

**जिंतूर,/प्रतिनिधी :** दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी गुरुवार सर सय्यद अहेमद खान उर्दू प्रा शा जिंतूर या शाळेत इयत्ता ०७ वी च्या विद्यार्थ्यांचा *''स्वयंशासन दिन'' तसेच सहावीच्या विद्यार्थ्यांकडून सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.
सकाळी ०८:०० ते ०१:०० वाजता इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ''स्वयंशासन दिन'' चे आयोजन करण्यात आले होते. ज्या मध्ये मुख्याध्यापिका म्हणून शेख जुनेरा शेख असेफ यांनी तर उपमुख्याध्यापक म्हणून पठाण हमज़ा खान अवेस खान यांनी कार्यभार सांभाळला. एकुण ४८ विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून इयत्ता पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. सोबतच एक लिपिक व दोन सेवक म्हणून एकूण ५१ कर्मचाऱ्यांनी शाळेच्या का कार्यभार उत्तम प्रकारे सांभाळले. या वेळेत वर्ग ७ वी च्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक ,उपमुख्याध्यापक व शिक्षक तसेच शिक्षकतर कर्मचारी यांना एका दिवसासाठी प्रशासन चालविण्याच्या




अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व संस्थेचे आभार मानले. यावेळी सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम संपन्न झाल्यावर विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

दुपारी ०१:०० वाजता इयत्ता सातवीचा विद्यार्थ्यांसाठी ''निरोप समारंभ'' कार्यक्रम ठेवण्यात आला होता.
या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक त्याचे शिक्षक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## टेक एक्सेलरेट २०२६' विज्ञान प्रदर्शनात गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दुहेरी यश

**परभणी,/प्रतिनिधी :** श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे दिनांक २९ व ३० मार्च रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय रोबोटिक चॅम्पियनशिप 'टेक एक्सेलरेट २०२६' अंतर्गत विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत गांधी विद्यालय माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी दुहेरी यश संपादन केले.

या स्पर्धेत सुमारे ७० संघांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी अंतिम फेरीसाठी १० संघांची निवड करण्यात आली होती. ३० मार्च रोजी झालेल्या बक्षीस वितरण समारंभात गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली ठळक छाप उमटवली. गांधी विद्यालयातील स्वराज बालासाहेब खटिंग (इ.७ वी) व पृथ्वीराज बालासाहेब खटिंग (इ.५ वी) यांच्या 'इलेक्ट्रिसिटी सेव्हर' या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. या विजेत्या संघाला पारितोषिक प्राचार्य प्रा. डॉ. आनंद पाथ्रीकर, परीक्षक प्रा. डॉ. बी. जी. शिंदे व प्रा. डॉ. जमीरुद्दीन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या प्रकल्पासाठी विज्ञान शिक्षक मिलिंद मारोतराव बगाटे यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षकांनी या मॉडेलचे विशेष कौतुक करून त्याचे पेटंट घेण्याचा सल्ला दिला.

तसेच, विद्यालयातील वैभव ज्ञानेश्वर पांचाळ (इ.८ वी) व शौर्य ज्ञानेश्वर पांचाळ (इ.५ वी) यांनी सादर केलेल्या 'कॅटल सेव्हर'या प्रकल्पाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या प्रकल्पामध्ये ज्ञानेश्वर सुभाष पांचाळ यांचे मोलाचे योगदान असून परीक्षकांनी या मॉडेलचे विशेष प्रशंसोद्गार काढले. याशिवाय, कु. शौर्या विठ्ठलराव भुसारे व कु. आर्या प्रल्हाद भुसारे (इ.८ वी) यांच्या 'बेबी सेफ्टी बेड' या प्रकल्पात आवश्यक सुधारणा केल्यास त्याला पेटंट मिळण्याची शक्यता असल्याचे परीक्षकांनी नमूद केले.

## वडाळीत 'उत्तम कापूस प्रकल्प' अंतर्गत शेतकरी प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** मौजे वडाळी (ता. जिंतूर, जि. परभणी) येथे दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी 'उत्तम कापूस प्रकल्प' (कॉटन कनेक्ट साउथ एशिया), जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट आणि कृषी विज्ञान केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शेतकरी बांधवांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडाळी गावच्या सरपंच सौ. सुशिलाबाई सितारामजी नवले उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रा. अमित तुपे (शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र), श्री. सी. आर. देशमुख (माती परीक्षण प्रयोगशाळा प्रमुख), सहायक कृषी अधिकारी श्री. लिपणे (जिंतूर), श्री. चंद्रकांत देशमुख (एटीएम, आत्मा विभाग), श्री. अमोल थिटे (जैविक निविष्ठा उत्पादक शेतकरी, वरुड नृसिंह) तसेच श्री. शरद ठमके (प्रकल्प व्यवस्थापक, उत्तम कापूस प्रकल्प) आदी मान्यवर उपस्थित होते.
मार्गदर्शनाचे मुख्य मुद्दे कार्यक्रमात विविध तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले प्रकल्पाची माहिती: प्रकल्प व्यवस्थापक श्री. शरद ठमके यांनी 'उत्तम कापूस प्रकल्प'ाची उद्दिष्टे व विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. पीक व्यवस्थापन: प्रा. अमित तुपे यांनी कापूस पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. माती आरोग्य: श्री. सी. आर. देशमुख यांनी माती नमुना घेण्याची पद्धत, माती परीक्षणाचे महत्त्व आणि योग्य खत व्यवस्थापन यावर सखोल माहिती दिली. जैविक निविष्ठा: श्री. चंद्रकांत देशमुख यांनी दशपर्णी अर्क, जीवामृत यांसारख्या जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर यावर मार्गदर्शन केले. शासकीय योजना: सहायक कृषी अधिकारी श्री. लिपणे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. मोठ्या संख्येने उपस्थिती या कार्यक्रमाला वडाळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष श्री. उत्तमराव ढोले, उपसरपंच श्री. गंगाधर अप्पा तरटे, ग्रामपंचायत सदस्य श्री. देविदासराव गरड, श्री. बळीराम जवादे, सुनितााताई ढोले, पोलीस पाटील कु. रेखाताई नवले, माजी सरपंच श्री. पंडितराव ढोले, माजी उपसरपंच श्री. भास्करराव तसेच प्रगतशील शेतकरी श्री.



विनायक ढोले, सचिन तरटे, संदिप तरटे, दत्तराव दुभळकर, ओम तरटे, सोमेश्वर तरटे, बळीराजा शेतकरी गटाचे अध्यक्ष श्री. भारत सखारामजी रोकडे यांसह बी.सी. आय. शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रक्षेत्र सहायक कु. सपना सुरेशराव तिर्थे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. अमोल थिटे यांनी मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रक्षेत्र सहायक कु. सपना तिर्थे व प्रकल्पातील शेतकरी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# काळे ढग, रुपेरी रेषा

सुमारे चार वर्षांपूर्वी, २०२२ मध्ये जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांच्या जी-२० परिषदेपाठोपाठ कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राशी संबंधित असलेल्या 'ग्लोबल पार्टनरशिप ऑफ आर्टिफिशियल इन्टेलिजन्स' (जीपीएआय) या आंतरराष्ट्रीय जागतिक भागीदारी संघटनेचे अध्यक्षपदही भारताकडे आले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जबाबदार आणि मानवकेंद्रित विकास साधण्याबाबतच्या भारताच्या भरीव कामगिरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही मान्यता मानली जाते. तरीही, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाची चिंता दूर झालेली नाही. २०२३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाबाबत चिंता व्यक्त करणारा सूर उमटला होता. कृत्रिम बुद्धिमत्ता हे संकट आणि की वरदान यावर त्या परिषदेत स्पष्ट एकमत झालेले नाही, परंतु याचा वापर विवेकाने झाला नाही, तर हे संकटच ठरणार यावर मात्र अनेक राष्ट्रांचे एकमत झाले होते. यंत्र आणि तंत्र ही मानवाच्या भौतिक विकासाची साधने हाती लागल्यामुळे बहुतांश समाज तंत्रजीवी होत असून, आता तर मानवी मेंदूकरवी करून घेतली जाणारी अनेक कामे करण्यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता आता सिद्ध झाली आहे. जिथे मानवी मेंदूची क्षमता संपते, तेथे कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सुरू होते, असे या तंत्राबाबत अभिमानाने सांगितले जाते. जगातील अनेक देशांनी विकासाच्या नव्या वाटचालीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्राधान्याने सुरूदेखील केला असून, नजीकच्या भविष्यात माणसाच्या सहभागाची गरज असलेल्या क्षेत्रांतही कृत्रिम बुद्धिमत्तेला कामाला लावता येईल, असे लक्षणीय संशोधन पूर्ण झाले आहे. जसजशी प्रगतीच्या पुढच्या टप्प्याची प्रतीक्षा सुरू होते, तसतसे तंत्रावलंबित्व वाढत चालल्यामुळे एक दिवस यंत्रांच्या स्वाधीन होऊन, अवयवांकरवी करून घ्यावयाची सारी कामे यंत्रांकरवी करून घेण्याची वेळ येईल आणि माणसाचेच यंत्र होऊन जाईल हा विचार शक्यतेच्या सीमा ओलांडून वास्तवाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने माणसाच्या मेंदूचे काम बरेचसे हलके केल्यानंतर प्रगतीचा टप्पा माणसाला कोणत्या नव्या विचाराच्या किंवा चिंतेच्या खाईत नेऊन सोडणार आहे, याचा विचार करण्याची ही वेळ आली आहे. कारण, माणसाची कामे सोपी करण्यासाठी यंत्रांच्या विश्वात प्रगती करता करता माणसाचेच यंत्र व्हावे ही कल्पना कालपरवापर्यंत मोठी मनोरंजक वाटत होती. पण ही कल्पना आता केवळ स्वप्नरंजन राहिलेली नाही. मानवी मेंदूमध्ये बसविली जाणारी एक लहानशी चिप मेंदूच्या कामाचा ताण हलका करण्यास समर्थ ठरणार आहे. तशी चिप बसविण्याचा, म्हणजे मानवी मेंदूमध्ये चिपचे प्रत्यारोपण करण्याचा प्रयोग अमेरिकेत यशस्वी झाल्याची घोषणा अमेरिकेतील एक उद्योगपती एलन मस्क यांनी काही वर्षांपूर्वी केली आणि त्याचे पडसाद जगभर उमटले. मस्क यांच्या कंपनीनेच अशी चिप तयार केली आणि ज्या माणसाच्या मेंदूत ही चिप यशस्वीपणे बसविली आहे, त्याची प्रकृती उत्तम असून काही कामे करण्याकरिता ही चिप मेंदूला सहकार्य करू शकणार आहे. मानवी मेंदूमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचेच एक प्रकारे रोपण करणारी ही चिप बसविण्याकरिता अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने परवानगी दिल्यानंतर लगेचच, म्हणजे केवळ सहा-सात महिन्यांतच अमेरिकेत चिपयुक्त मेंदूचा माणूस तयारही झाला आणि माणसाचे यंत्र होण्याचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्णदेखील झाला.

नव्या जगातील माणूस नावाचे हे यंत्र प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर पोहोचत असतानाच, नैसर्गिक मेंदूच्या कमाल क्षमता सिद्ध करणाऱ्या बुद्धिमान तरुण पिढीचे काय होणार हा प्रश्न आता भयाणपणे समोर उभा राहिला आहे. भविष्याच्या सुरक्षिततेबाबत आश्वस्त असलेल्या तरुणाईला याच तंत्रावलंबित्वाचा फटका बसू लागला आहे. ओरॅकल नावाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील एका कंपनीतील तब्बल १२ हजार कुशल भारतीय कर्मचाऱ्यांना एका नव्या पहाटे केवळ एका ई-मेलद्वारे हाती नारळ देऊन नोकरीवरून काढून टाकल्याचा संदेश येतो, तेव्हा नव्या तंत्रावलंबित्वाचे परिणाम सुस्पष्टपणे जाणवू लागतात. म्हणूनच, विकासाची रुपेरी रेषा या भावनेने ज्या तंत्रज्ञानाकडे पाहिले जात होते, त्या रेषेमागे चिंतेचे काळे ढगदेखील आहेत, ही जाणीव आता गडद होऊ लागली आहे. ओरॅकल नावाच्या कंपनीतील १२ हजार भारतीय कर्मचाऱ्यांवर आदळलेली बेरोजगारीची कुऱ्हाड ही तर केवळ एक सुरुवात आहे.

सध्या युद्धस्थितीमुळे सर्वत्र अनिश्चिततेची दाट छाया पसरलेली असताना त्याच्या भयात भर घालणाऱ्या अशा घडामोडींतही दिलाशाची दुसरी बाजू अंधुकपणे उजोडात येताना दिसते, तेव्हा नैराश्याचे गडदपणही काहीसे धूसर होऊ लागते. युद्धाच्या संकटामुळे जगभरातील अनेक अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसू लागला असून त्याच्या झळा घराघरापर्यंत पोहोचू लागल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेपासून, खते, औषधे आणि चप्पल-बुटांसारख्या वस्तूदेखील महागाईच्या गर्तेत गटांगळ्या खाऊ लागल्याने, आर्थिक व्यवस्थापनाची चिंता दिवसागणिक गडद होणार आहे. अशा संकटाच्या परिस्थितीत बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्यासारखी अन्य चिंताजनक बाब नाही. तरीही, दुसरीकडे मात्र रोजगाराच्या संधींबाबतचे सामान्य चित्र मात्र काहीसे दिलासादायक असल्याची सुखद वार्ता नुकतीच समोर आल्याने, चिंतेच्या काळ्या ढगांची रुपेरी किनार जाणवून देणारी आनंददायी बाब म्हणून त्याकडे पाहावे लागेल. केंद्र सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयातर्फे जारी करण्यात आलेल्या आवधिक बल सर्वेक्षण (पीएलएफएस) या ताज्या वार्षिक अहवालाचे काही निष्कर्ष असे दिलासादायक ठरत आहेत. देशातील सामान्य बेरोजगारी कमी होत असून क्षमतावान समाजघटकांचा श्रमाच्या कामातील सहभाग वाढल्याने अर्थव्यवस्था संकटजन्य परिस्थितीत नाही असा या अहवालाचा निष्कर्ष आहे. महिलांचे उत्पन्न पुरुषांच्या उत्पन्नाच्या तुलनेत सुमारे ३१ टक्क्यांनी कमी आहे, पण ते वेगाने वाढत आहे. कदाचित, कामातील सहभागातील महिला व पुरुषांच्या असमानतेमुळे तसे होत असावे. मात्र, जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात पुरुषांचे वेतन सरासरी ५.८० टक्क्यांनी तर महिलांचे वेतन सरासरी ७.१६ टक्क्यांनी वाढले आहे. गेल्या वर्षभरात महिलांच्या श्रमाची सरासरी दैनिक मजुरीदेखील १६ रुपयांनी वाढली आहे. स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात मात्र, महिलांचा सहभाग पुरुषांच्या संख्येच्या तुलनेत काहीसा कमी असून या क्षेत्रात पुरुषांची कमाई महिलांच्या कमाईतून तिप्पट असल्याचा या अहवालाचा निष्कर्ष आहे. विशेष म्हणजे, या वर्षभरात बेरोजगारीचा दर ३.३ टक्क्यांवरून ३.१ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. शिक्षित वर्गातील बेरोजगारी तब्बल अर्धा टक्क्याने कमी झाली असून बेरोजगारीचा दर साडेसात टक्क्यांवर आला आहे आणि युवकांमधील बेरोजगारीदेखील कमी झाली आहे. देशातील ६७.८ टक्के लोकसंख्या किमान माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षित असली तरी केवळ ४.२० टक्के लोकसंख्येकडे औपचारिक तंत्रशिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण असल्याने, नव्या जगाची तंत्रस्नेही असण्याची गरज भागविण्यात ही लोकसंख्या कमी पडत आहे. ही चिंतेची बाब आहेच, शिवाय, रोजगारक्षम वर्गातील कौशल्य आणि क्षमतांची कमतरताही अधोरेखित होते. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांमधील ही तफावत दूर होण्याची गरज आहेच, पण भविष्यात ज्या बाबींमुळे असुरक्षिततेचे सावट गडद होऊ शकते, त्या संकटांना सामोरे जाण्याची क्षमता प्राप्त करण्याचे मोठे आव्हान रोजगारक्षम लोकसंख्येस पेलावे लागणार आहे. ओरॅकल नावाच्या एका कंपनीतील कर्मचाऱ्यांवर कोसळलेल्या संकटातून आणि रोजगारविषयक सर्वेक्षणातून समोर आलेल्या सामान्य बाबींतून भविष्याच्या धोरणांची दिशा ठरवावी लागेल, हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. पंधरा ते २९ या वयोगटातील सुमारे २५ टक्के तरुण रोजगार किंवा शिक्षण यामध्ये कोठेच नाहीत, ही बाबदेखील काळजीची काजळी गडद करणारी आहे. भविष्याचे संकेत स्पष्टपणे मिळत असताना, केवळ रुपेरी रेषेकडे पाहत आनंद मिळविण्यापेक्षा काळ्या ढगांची दखल घेतली नाही, तर ते महागात पडू शकते.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# करदात्यांसाठी नवा युगारंभ; आयकर कायदा २०२६ समजून घ्या

१ एप्रिल २०२६ पासून भारताच्या कर प्रणालीमध्ये एक महत्त्वपूर्ण बदल होणार आहे. आयकर कायदा, १९६१ च्या जागी नवीन आयकर कायदा लागू होत असून, हा कायदा अधिक सोपा, पारदर्शक आणि करदात्यास अनुकूल बनविण्याचा प्रयत्न आहे. हा बदल केवळ कायद्यातील सुधारणा नसून, प्रत्येक करदात्याच्या आर्थिक नियोजनावर थेट परिणाम करणारा आहे.

नवीन कायद्यामध्ये ''कर वर्ष'' ही संकल्पना लागू करण्यात आली आहे. पूर्वी आर्थिक वर्ष आणि मूल्यांकन वर्ष यामधील गोंधळ आता दूर करण्यात आला असून, ज्या वर्षात उत्पन्न मिळेल त्याच वर्षात कराची गणना होणार आहे. यामुळे करदात्यांना रिटर्न फाइलिंग अधिक सोपे आणि स्पष्ट होणार आहे.

यासोबतच, नवीन कर पद्धतीला डीफॉल्ट दर्जा देण्यात आला आहे. करदात्यांनी वेगळा पर्याय निवडला नाही तर नवीन पद्धतीनुसार कर लागू होईल. तरीदेखील, जुनी पद्धत कायम ठेवण्यात आली आहे. जुन्या पद्धतीमध्ये ८० सी, ८० डी, एचआरए यासारख्या वजावट उपलब्ध आहेत, तर नवीन पद्धतीमध्ये कमी कर दर असून वजावट मर्यादित आहेत. विशेष म्हणजे मानक वजावट आता नवीन पद्धतीतही उपलब्ध आहे, ज्यामुळे पगारदार वर्गाला दिलासा मिळतो.

नवीन कायद्यामध्ये मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे. सुमारे १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होण्याची तरतूद असून, मानक वजावट धरल्यास १२.७५ लाखांपर्यंत कराचा भार कमी होऊ शकतो. त्यामुळे पगारदार आणि निश्चित उत्पन्न असलेल्या व्यक्तींना मोठा फायदा होणार आहे.

वरिष्ठ नागरिकांसाठी कर नियोजन विशेष महत्त्वाचे आहे. जुन्या पद्धतीमध्ये वयोमानानुसार करमुक्त मर्यादा जास्त आहे (रु. ३ लाख/ रु. ५ लाख), तसेच कलम ८० टीटीबी अंतर्गत ५०,००० पर्यंत व्याजावर वजावट उपलब्ध आहे. नवीन पद्धतीमध्ये अशा सवलती नसल्याने ज्येष्ठ नागरिकांनी दोन्ही पद्धतींची तुलना करून निर्णय घेणे आवश्यक आहे. याशिवाय, फॉर्म १२१ (फॉर्म १५एच) वेळेवर सादर केल्यास बँकेकडून होणारा टीडीएस




टाळता येऊ शकतो.

पगारदार व्यक्तींसाठी जेवण व्हाऊचर/कार्डवर रु. १.०५ लाखांपर्यंत करसवलत हा एक नवीन आणि व्यवहार्य फायदा आहे. योग्य पगार रचना केल्यास कर बचत करता येते. त्यामुळे वर्षाच्या सुरुवातीलाच एचआर किंवा कर सल्लागाराशी चर्चा करणे आवश्यक आहे.

नवीन कायद्यात आयटीआर फाइलिंग प्रक्रिया अधिक सोपी करण्यात आली आहे. आधीच भरलेला डेटा, सुलभ फॉर्म आणि डिजिटल प्रणालीमुळे अनुपालन सुलभ झाले आहे. तसेच सुधारित परताव्यासाठी अधिक लवचीकता देण्यात आली आहे, ज्यामुळे चुका दुरुस्त करण्याची संधी मिळते.

गुंतवणुकीच्या बाबतीत भांडवली नफा नियमांमध्येही बदल करण्यात आले आहेत. शेअर बायबॅक वर भांडवली नफा लागू करण्यात आला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांच्या गुंतवणुकीचे कर परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन कायद्यात पारदर्शकतेवर विशेष भर देण्यात आला आहे. करदात्यांनी सर्व उत्पन्न, विशेषतः विदेशी मालमत्ता आणि व्यवहार, अचूकपणे जाहीर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती दिल्यास दंड आणि कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

महत्त्वाच्या देय तारखा (आर्थिक वर्ष २०२५-२६) - प्रत्येक करदात्याने लक्षात ठेवाव्यात नवीन बदलांनुसार काही महत्त्वाच्या तारखांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे :

आयटीआर १ आणि आयटीआर २ (सामान्य करदाते) : ३१ जुलै २०२६ (कोणताही बदल नाही)

आयटीआर ३ आणि आयटीआर ४ (व्यवसाय/प्रोफेशन): ३१ ऑगस्ट २०२६ (पूर्वी ३१ जुलै)

ऑडिट असलेली प्रकरणे : ३१ ऑक्टोबर २०२६ (बदल नाही)

सुधारित विवरणपत्र/अद्ययावत विवरणपत्र : (३१ मार्च २०२७, पूर्वी ३१ डिसेंबर) याशिवाय आगाऊ कराच्या तारखा देखील महत्त्वाच्या आहेत :

१५ जून - १५ टक्के, १५ सप्टेंबर - ४५ टक्के, १५ डिसेंबर - ७५ टक्के, १५ मार्च - १०० टक्के. या तारखा पाळल्या नाहीत तर व्याज आणि दंड लागू होऊ शकतो.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन**

पेंशन आणि व्याज उत्पन्नाची अचूक नोंद ठेवावी
फॉर्म १२१ (फॉर्म १५एच) वेळेवर भरावा
८० टीटीबी आणि ८० डीडीबी कपातचा योग्य वापर करावा
वैद्यकीय खर्चाचे पुरावे जतन करावेत
नवीन व जुनी पद्धत यांची तुलना करूनच पर्याय निवडावा

**वर्षाच्या सुरुवातीला कर नियोजन का आवश्यक?**

कर नियोजन हे वर्षाच्या शेवटी करण्यापेक्षा वर्षाच्या सुरुवातीला केल्यास अधिक फायदेशीर ठरते. योग्य वेळी : कर पद्धत निवडणे, गुंतवणूक नियोजन करणे, सर्व कागदपत्रे व्यवस्थित ठेवणे

उत्पन्नाचे स्रोत ट्रॅक करणे. यामुळे शेवटी कराचा ताण कमी होतो.

**निष्कर्ष** : नवीन आयकर कायदा २०२६ हा कर प्रणाली अधिक सोपी, पारदर्शक आणि आधुनिक बनविणारा आहे. मात्र या सोपेपणासोबत करदात्यांवर अधिक जबाबदारीही येते. योग्य माहिती, वेळेवर नियोजन आणि पूर्ण अनुपालन केल्यास करदात्यांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होऊ शकतो.

शेवटी, प्रत्येक करदात्याने हे लक्षात ठेवावे ''कर नियोजन हे वर्षाच्या शेवटी नव्हे, तर वर्षाच्या पहिल्याच दिवसापासून सुरू झाले पाहिजे.''

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# लेझी गर्ल जॉबचा ट्रेंड

फार आधी नाही, अगदी ५-६ वर्षांपूर्वीपर्यंत आपल्या कामात खूप मेहनत करणे, उशिरापर्यंत काम करणे, फटाफट कामे आटोपून पुढच्या जबाबदाऱ्या घेणे, ही यशाची गुरुकिल्ली मानली जात होती. पण, आता जेन झी युवावर्गाला असे वाटत नाही. लेझी गर्ल जॉब्ज् या लोकप्रिय वर्कप्लेस ट्रेंडनुसार, खूप मेहनत करून यश मिळतंच असं नाही. त्यापेक्षा कामाच्या लवचीक वेळा, कामाचा संतुलित ताण आणि आपलं काम-जीवन यात योग्य ताळमेळ साधणं, जास्त महत्त्वाचं मानलं जातंय. आटोपता येतील एवढ्याच जबाबदाऱ्या आणि कमी ताण घेतल्यासही यश मिळू शकतं, असं हा ट्रेंड शिकवतो.

२६ वर्षांची अन्वी तिच्या कंपनीसाठी वर्क फ्रॉम होम करते. सकाळी ९.३० वाजता ती लॅपटॉपवरून लॉग इन करते. ठरावीक काम, मीटिंग्ज अटेंड करते आणि सायंकाळी ५.३० वाजता लॉग आऊट होऊन लॅपटॉप बंद करून योगावर्गाला निघून जाते. पण, दोन महिन्यांपूर्वी असं नव्हतं. सकाळी ९.०० वाजता लॉग इन करणारी अन्वी रात्री-अपरात्री मेल चेक करायची, केव्हाही होणाऱ्या मीटिंगला धडपडत उपस्थित राहायची. सतत कामाच्या तणावात पिचलेल्या, थकलेल्या अन्वीने विचार केला. तिला घडवायचं असलेलं करीयर हे आहे का? कामाशिवाय आयुष्यात काहीही उरणार नाही, हे यश आहे का? पण, या वैचारिक मंथनातून तिने स्वतःच्या गरजांनुसार नोकरी शोधली. तुलनेने कमी असला तरी निश्चित पगार, कामाचे ठरावीक तास आणि उरलेला स्वतःसाठीचा वेळ देणारी ही नोकरी आहे. अशा नोकऱ्यांना सोशल मीडियावर लेझी गर्ल जॉब्ज् म्हणून ओळखतात. हे विचित्र वाटत असलं तरी खरं आहे. तज्ज्ञांच्या मते, या ट्रेंडमधून युवावर्गाचे बदललेले विचार दिसतात. आपले वैयक्तिक जीवन कायम ठेवून, एक चांगले आणि स्थायी करीयर घडविण्याकडे युवकांचा कल आहे.

लेझी गर्ल जॉब्ज् म्हणजे नेमकं काय? तर, कामाचे लवचीक तास, टारगेटचा तणाव नसलेली आणि महत्त्वाचं म्हणजे जास्तीचे काम न करताही व्यवस्थित पगार देणारी नोकरी! आपल्या महत्त्वाकांक्षांना जरा मुरड घालून, जीवनाचा आनंद घेण्यासाठी केलेली तडजोड म्हणजे लेझी गर्ल जॉब्ज्! याचा अर्थ ही जेन झी मंडळी काम टाळतात, आळशी आहेत, ऐतखाऊ आहेत, असा अजिबात नाही. सतत मेहनत करून, समाजमान्यता असलेलं व्यावहारिक यश मिळविण्याच्या पारंपरिक विचाराला छेद देणाऱ्या या जेन झी विचाराकडे लक्षपूर्वक बघायला हवं. जेन झी मुला-मुलींचं उद्दिष्ट अगदी सोपं आहे. स्मार्टवर्क करून, चांगली कमाई करायची आणि मग आपलं वैयक्तिक आयुष्य आनंदाने जगायचं. यात अगदी फूलशेती करण्यापासून, शास्त्रीय संगीत शिकण्यापर्यंत आणि घरी बाईक दुरुस्तीपासून कुकरी क्लासेस लावण्यापर्यंत कोणत्याही कामाचा आनंद असू शकतो.

हा बदल एका रात्रीतून आलेला नाही. जगभरातील वर्कप्लेसेसवर केलेल्या संशोधनानुसार, जास्त तणाव युवावर्गाच्या कामाला आणि करीयरला प्रभावित करतो. स्टेट ऑफ द ग्लोबल वर्कप्लेसच्या अहवालानुसार, जगभरातील ७६ टक्के कर्मचारी कधी-कधी तणावपूर्ण मानसिक अवस्थेत काम करतात. तर, २८ टक्के कर्मचारी क्वचित किंवा नेहमीच तणावात काम करतात. सतत तणावात राहिल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. एका विशिष्ट वयानंतर, वारंवार आजारी पडणे आणि लहानसहान कारणांनी सुट्या घेण्याच्या प्रमाणात ६३ टक्के वाढ होते. विशेष म्हणजे असे लोक लेझी गर्ल जॉब्ज् शोधू लागतात. या संशोधनानुसार, जगभरातील केवळ ३३ टक्के कर्मचारी स्वतःला यशस्वी मानतात. जेन झी म्हणजे वर्ष १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी! यांची विशेषता म्हणजे ते पूर्णतः डिजिटल नेटिव्ह म्हणजे स्मार्टफोन्स आणि सोशल मीडियासोबत मोठी झालेली पिढी आहेत. खूप भावनिक नसली तरी विविधता, समानता आणि मानसिक आरोग्यासह सामाजिक बदलांमध्ये बिनदिक्कत पुढाकार घेणारी ही पिढी आहे. आला क्षण आनंदाने जगायला हवा, पुढचा विचार करून कशाला स्वतःला गुंतवायचं? कामाच्या वेळी स्मार्ट काम करायचं आणि वैयक्तिक आयुष्याचा आनंद घेताना कामाकडे बघायचंही नाही, हा त्यांच्या जीवनाचा सहज फंडा आहे. वेळोवेळी नॉस्टॅल्जिक होणे, जुनी ॲनालॉग पद्धती समजून घेणे, स्वतःला डिटॉक्स करणे या त्यांच्या प्राथमिकता आहेत. संशोधनानुसार, लेझी गर्ल जॉब्ज् ही संकल्पना करीयरमधील उच्चतम यशाऐवजी स्वतःचं उत्तम आरोग्य आणि आनंदी जीवनाला प्राधान्य देते आहे. सोप्या भाषेत वैयक्तिक आयुष्यासोबत, आनंदी क्षण आणि नात्यांसोबत तडजोड न करता नोकरी करणं, ही यशस्वी करीयरची नवी व्याख्या आहे.

९८५०३३९२४०

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नैतिक प्रश्न

लष्करी आणि गुप्तहेर खात्यांकडून सतत नवीन तंत्रज्ञानाचा पाठपुरावा केला जात असतो. शत्रूच्या एक पाऊल पुढे राहण्याचा हा प्रयत्न असतो. यामुळेच त्यांनी न वापरलेले तंत्रज्ञान कालांतराने इतर संस्था वा व्यक्तीपर्यंत पोहोचते (किंवा काही वेळा ते अधिकृतपणे औद्योगिक वापरासाठी खुलेही केले जाते). मग त्यावर काही व्यक्ती अधिक संशोधन करतात, प्रबंध वा पुस्तके लिहितात आणि अशा प्रकारे माहितीचा प्रसार होत जातो. यात मूळ यंत्रणांचे काहीच नुकसान होत नसल्याने त्या या प्रसाराकडे फारसे लक्ष देत नाहीत. हॅकिंगचे नवनवे मार्ग यातूनच उदयाला येतात. आज सर्वोच्च लष्करी खात्याच्या हाती असलेले तंत्र अशा प्रकारे खाली झिरपायला फक्त तीन ते पाच वर्षे लागतात. एखाद्या यंत्रणेवर हल्ला करणे ही बाब तिचे संरक्षण करण्यापेक्षा निश्चितच अधिक सोपी असल्याने आणि हा मार्ग वापरणारे घुसखोर थेट दिसत नसल्याने सायबर घातपातांचे प्रमाण वाढत आहे. पृथ्वीभोवती आज शेकडो नव्हे, हजारो उपग्रह फिरत आहेत. त्यापैकी बहुतेक उपग्रहांवर हवामानाचा अंदाज देणे आणि या ना त्या बहाण्याने (किंवा उघडपणेही) सर्वत्र नजर ठेवणे एवढेच काम सोपवलेले आहे, असे म्हणायला हरकत नाही. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्वसामान्य नागरिकाच्या अक्षरशः प्रत्येक हालचालीचा मागोवा घेणे शक्य असते. यावर विश्वास बसणे अवघड असले तरी ते सत्य आहे. एकविसाव्या शतकात युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक युद्धात सैनिक आणि शस्त्रास्त्रांचा वापर महत्त्वाचा होता, परंतु आज कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचा मुख्य घटक बनली आहे. इराणविरुद्ध इस्रायल-अमेरिका संघर्षात याचे स्पष्ट उदाहरण दिसते.

कृत्रिम बुद्धिमत्ता माहितीचे मोठ्या प्रमाणावर विश्लेषण करून लक्ष्य ओळखणे, निर्णय घेणे आणि हल्ल्यांचे नियोजन करणे, यासाठी वापरली जाते. त्यामुळे युद्ध अधिक वेगवान आणि अचूक झाले आहे. एआयमुळे युद्धातील निर्णयप्रक्रिया, लक्ष्य ओळखणे, हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये क्रांतिकारी बदल झाले आहेत. काही अहवालांनुसार एआयच्या मदतीने केवळ बारा तासांमध्ये जवळपास ९०० हल्ले करण्यात आले. हे पारंपरिक युद्धात अशक्यप्राय होते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग, अचूकता आणि निर्णयक्षमता अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे. अत्यल्प वेळेत लक्ष्य शोधणे, त्याचे विश्लेषण करणे आणि हल्ला करणे शक्य झाले आहे. त्यामुळे युद्ध केवळ शक्तीचे नव्हे तर तंत्रज्ञानाचे झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेसारखे विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. युद्धात याचा उपयोग विविध स्तरांवर केला जातो. मोठ्या प्रमाणावर माहिती संकलन करून तिचे विश्लेषण करणे, शत्रूच्या हालचालींचा अंदाज लावणे, लक्ष्य निश्चित करणे आणि योग्य वेळी हल्ला करणे, या सर्व गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यंत सोप्या झाल्या आहेत. पूर्वी या सर्व प्रक्रिया मानवी विश्लेषकांवर अवलंबून होत्या. त्या वेळखाऊ आणि कधी कधी अचूक नसत. आता कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये हजारो माहितीबद्दूंचे विश्लेषण करून अधिक अचूक निष्कर्ष देते.

अधिक अचूक हल्ले, जलद निर्णय आणि सैनिकांचे कमी नुकसान हे याचे काही सकारात्मक परिणाम आहेत. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याचा धोका, नागरिकांचे नुकसान आणि संघर्ष अधिक वेगाने वाढण्याची शक्यता ही मोठी आव्हाने आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वांत मोठा प्रभाव म्हणजे युद्धातील वेग. पूर्वी लक्ष्य शोधण्यासाठी अनेक दिवस किंवा आठवडे लागत असत. माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि निर्णय घेणे ही प्रक्रिया संथ होती. आता मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये उपग्रह, सेन्सर, संचार प्रणाली आणि इतर साधनांमधून मिळालेली माहिती एकत्र करून योग्य लक्ष्य ओळखते. यामुळे निर्णयप्रक्रिया अत्यंत जलद झाली आहे. युद्धातील ही वेगवान प्रक्रिया संघर्षाची तीव्रता वाढवते. कमी वेळेत अधिक हल्ले करणे शक्य होते. त्यामुळे युद्धाचा कालावधी कमी होऊ शकतो, परंतु त्याची तीव्रता अधिक वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यल्प वेळेत मोठ्या प्रमाणावर हल्ले करणे शक्य झाले आहे. काही घटनांमध्ये काही तासांमध्येच शेकडो हल्ले करण्यात आले आहेत. ही गोष्ट पारंपरिक युद्धाच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी आहे. पूर्वी एका मोठ्या हल्ल्यासाठी मोठी तयारी करावी लागायची, वेळ लागायचा आणि अनेक टप्पे पार करावे लागत. आता ही प्रक्रिया स्वयंचलित झाली आहे. यामुळे युद्ध अधिक आक्रमक झाले आहे. शत्रूला प्रतिक्रिया देण्याची संधी कमी मिळते आणि संघर्ष अधिक तीव्र होतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवरहित विमान, स्वयंचलित शस्त्रे आणि यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ही साधने स्वतः लक्ष्य शोधू शकतात, त्याचे विश्लेषण करू शकतात आणि आवश्यक असल्यास हल्लाही करू शकतात. यामुळे मानवी सहभाग कमी होतो आणि धोकादेखील कमी होतो. परंतु याच गोष्टीमुळे एक मोठा प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे यंत्रांनी स्वतः निर्णय घेतले तर त्यांची जबाबदारी कोण घेणार? कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ रणांगणापुरती मर्यादित नाही. ती सायबर युद्धामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते. शत्रूच्या संगणकीय प्रणालींवर हल्ला करणे, वीजपुरवठा खंडित करणे, बँकिंग प्रणालीमध्ये अडथळे निर्माण करणे या गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शक्य झाल्या आहेत. तसेच माहिती युद्धामध्येही तिचा मोठा वापर होतो. खोटी माहिती पसरवणे, जनमतावर प्रभाव टाकणे आणि समाजामध्ये गोंधळ निर्माण करणे हादेखील युद्धाचा एक भाग बनला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग वाढल्यामुळे काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसतात. सकारात्मक बाजू म्हणजे हल्ले अधिक अचूक होतात, सैनिकांचे नुकसान कमी होते आणि निर्णय जलद घेतले जातात. परंतु नकारात्मक बाजू अधिक गंभीर आहे. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे निरपराध नागरिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच युद्धाचा वेग इतका वाढतो की त्यावर नियंत्रण ठेवणे कठीण होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर युद्धामध्ये केल्यामुळे अनेक नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वांत मोठा प्रश्न असतो जबाबदारीचा. कृत्रिम बुद्धिमत्तेने चुकीचा निर्णय घेतला, तर त्यासाठी जबाबदार कोण?

इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका संघर्षाने दाखवून दिले आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. ती युद्ध अधिक वेगवान, अचूक आणि प्रभावी बनवते, परंतु त्याच वेळी अनेक नैतिक आणि मानवी प्रश्न निर्माण करते. योग्य नियंत्रण नसेल तर हे तंत्रज्ञान मानवतेसाठी मोठा धोका ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता एक शक्तिशाली साधन आहे. तिचा उपयोग कसा केला जातो यावर भविष्यातील जग अवलंबून आहे. ती युद्ध अधिक घातक बनवू शकते कवा शांततेसाठीही उपयोगी ठरू शकते. म्हणूनच आजची सर्वांत मोठी गरज म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने, नैतिकतेने आणि मानवहितासाठी करणे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

### श्री हनुमान चालीसा : जीवन सकारात्मक करणारा मंत्र...

संतांनी देवी-देवतांची स्तुती करण्यासाठी अनेक स्तोत्रे रचलेली आहेत. केवळ स्तुती करणे हा या स्तोत्रांचा उद्देश नसून, विशिष्ट लयीत आणि योग्य उच्चारांनी म्हटलेल्या स्तोत्रांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यांपैकीच एक म्हणजे संत श्री गोस्वामी तुलसीदास यांनी रचलेली श्री हनुमान चालीसा! श्री हनुमान चालीसा अवधी भाषेत रचलेली आहे. 'चालीसा' म्हणजे चाळीस चौपद्या असलेली स्तुती! या प्रत्येक चौपदीत श्री हनुमानाचे गुण, पराक्रम आणि भक्तीचे महत्त्व वर्णन केलेले आहे. दररोज हनुमान चालीसा पठन केल्याने मनाला शांती मिळते, भीती नष्ट होते. हनुमान हे संकटमोचक आहेत; त्यामुळे संकटांचा सामना करण्याचे बळही या पठनातून मिळते. हनुमान चालीसामधील प्रत्येक ओळ आपल्यात धैर्य निर्माण करते आणि संयम बाळगायला शिकवते. आजच्या धावपळीच्या जीवनात अंतर्मनाची शांती मिळवण्यासाठी अर्थ समजून हनुमान चालीसाचे पठन दररोज करायला हवे.

**डॉ. स्वाती देशमुख**/ नागपूर

### पालखी मुक्काम परंपरेत खंड नको

जगद्गुरू संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांच्या वारीची थोर परंपरा म्हणजे महाराष्ट्राचा फार मोठा ऐतिहासिक, धार्मिक ठेवा, ज्याचा वाटतो प्रत्येकालाच हेवा. पंढरीच्या विठुरायाच्या भेटीच्या ओढीने वारकरी वारीची वाट चातकाप्रमाणे डोळे लावून पाहत असतो. तर 'साधू संत येती घरा तोचि आम्हां दिवाळी दसरा' असे म्हणत वारीचे मनापासून स्वागत करणारे देखील तेवढेच असुसलेले असतात.

पुण्याच्या ऐतिहासिक पूर्वभागात जवळजवळ ३५० वर्षे या दोन्हीही थोर संतांच्या पालख्या मुक्कामी विसावतात. त्या अवघ्या दोन दिवसांत संपूर्ण परिसर भगव्या पताकांनी भगवामय होऊन विठुरायाच्या जयघोषाने दूमदूमून जातो. वारकऱ्यांसाठी गोडधोड जेवणाच्या पंगती उठतात, तर कुठे अभंग-कीर्तनांनी सारा परिसर भक्तिरसात डूंबून जातो. पुणेकरसुद्धा मोठ्या दिलाने बिल्डिंगच्या पार्किंगमधून वारकरी मंडळींना वामकुक्षीसाठी जागा मिळवून देतात.

सकाळी उठून चहापान, नाश्ता देतात. गेली कित्येक वर्षांची ही महान परंपरा आहे. परंतु यंदा मात्र नको ते एक वेडं खूळ जन्माला घातलं जातयं.

काय तर म्हणे अपुऱ्या सोयी सुविधा व दाटीवाटीचे कारण पुढे करीत आळंदी देवस्थानमधील काही महाभागांनी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भवानी पेठेत न आणता तिच्या मुक्कामाची जागा बदलण्याचा उगाच घाट घातला आहे. आता चर्चेला सर्वत्र उधाण आले असून पूर्वभागातील नागरिकांमध्ये कमालीची नाराजी दिसून येत असतानाच एवढ्या वर्षांची जुनी परंपरा आता खंडित होतेय की काय, हा प्रश्न पडला असून त्यांच्या ठायी नकळत एक बोचरी खंत उरी दिसतेय. तरी यावर योग्य तोडगा काढून जुन्या महान परंपरेत खंड पडू नये ही अपेक्षा.

**आनंद बेंद्रे**/पुणे

## वाचक पत्रे

### पाणी... भविष्यातील ज्वलंत समस्या

आपल्या पूर्वजांनी पंचमहाभूतांना म्हणजेच पाणी, तेज, वायू, पृथ्वी व आकाश यांना देवाचे स्थान दिले आहे. यात पाण्याचे महत्त्व त्यांनी त्याकाळी सर्व गोष्टी मुबलक असून देखील खूप मोठ्या प्रमाणात जाणले होते. म्हणूनच नदीला किंवा कोणत्याही पाण्याच्या स्रोताला ते देव मानून किंवा आईचा दर्जा देऊन त्याची नित्यनेमाने पूजा करीत असत. परंतु पूर्वीच्या काळची आणि आजची परिस्थिती यात खूप फरक आहे. वाढती लोकसंख्या आणि त्यांच्या गरजा पुरवताना निसर्गावर प्रचंड ताण आला आहे. गेल्या काही वर्षांत निसर्गाचे सगळे संतुलन बिघडले आहे. दरवर्षी काही अंशाने पृथ्वीचे तापमान वाढत आहे. पृथ्वीवरील सर्व सजीवास जगण्याकरिता पाणी हा सगळ्यात मोठा स्रोत आहे आणि हे पाणी केवळ पावसाच्या रूपात पृथ्वीवर पडून सर्वच सृष्टीचे भवितव्य त्यावर अवलंबून असते. आणि तोच पाऊस गेले काही वर्षे अत्यंत लहरी, अनियमित असा झाला आहे. पावसाचा पॅटर्न गेल्या काही वर्षांत संपूर्णपणे बदलला आहे. देशाच्या काही भागात पावसाचा थेंब नाही तर कुठे प्रचंड प्रमाणात ढगफुटी व मुसळधार, अतिरेकी असा पाऊस पडून काही तासात नाले, नद्या, रस्ते भरभरून वाहत गाव, खेडी, शहरे पाण्याखाली देखील जात आहेत. शहराचा व अन्य भागांचा विचार करता संपूर्ण शहरावर काँक्रीटचे थर घातलेले त्यामुळे पाऊस कमी पडला काय किंवा अधिक पडला काय हे पाणी मुरायलाच आता कुठे जागा उरली नाही. त्यामुळे पाण्याचे लगेच फुगोटे तयार होऊन पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. विकासाच्या दिशेने वाटचाल करत असताना पाण्याचा प्रचंड मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला आहे. पण भविष्यात पाण्याचे मर्यादित साठे हे समस्त मानवाकरिता खूप मोठे आव्हान असणार आहे. आता तर गेल्या अनेक वर्षांपासून बाटलीबंद पाणी विकले जाऊ लागले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी कधी पैसे मोजावे लागतील असे स्वप्नात देखील वाटले नाही ते आज सत्यात उतरले आहे.

**लोकेश बापट**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# तिरुपती वस्ती, चंपावतीनगरचे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

## महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण चोरणाऱ्या महिलेला अटक



तभा. वृत्तसेवा

**केज |** लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या मुलीला भेटण्यासाठी निघालेल्या मंजुश्री जगदाळे या महिला केज बसस्थानकावर थांबल्या असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिलेने त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण लंपास केले होते. ही घटना १९ मार्चरोजी दुपारी घडली होती.

या प्रकरणी मंजुश्री जगदाळे यांनी केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक संशयित महिला त्यांच्या मागे उभी असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे ती बसमध्ये न चढता तेथून निघून गेल्याचेही आढळले.

या धागेदोऱ्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने तपास सुरू केला. जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके आणि पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे बीड येथील माऊली नगर परिसरातून संशयित महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून चोरीस गेलेले मिनी गंठणही जप्त करण्यात आले असून तिला पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दरम्यान, अटक करण्यात आलेली महिला सराईत चोर असल्याचे समोर आले असून तिच्याविरुद्ध विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंद आहेत. तिच्या अटकेमुळे आणखी काही चोरीच्या घटनांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

---

तभा. वृत्तसेवा

**बीड |** चंपावती नगरमधील तिरुपती वस्ती येथे आयोजित करण्यात आलेले 'हिंदू संमेलन' मोठ्या उत्साहात आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडले. या संमेलनात सामाजिक परिवर्तन आणि भारतीय संस्कृतीच्या संवर्धनावर विशेष भर देण्यात आला.



कार्यक्रमाचे मुख्य वक्ते श्री. अनिकेतजी लांडगे यांनी आपल्या बौद्धिक मांडणीतून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी प्रामुख्याने 'पंच परिवर्तन' ही संकल्पना मांडली, जी सामाजिक बदलासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. यामध्ये त्यांनी खालील मुद्द्यांवर विस्तृत प्रकाश टाकला

सामाजिक समरसता समाजात एकोपा आणि समानता टिकवून ठेवणे.

पर्यावरण संरक्षण: निसर्गाचे जतन करण्याची काळाची गरज.

कुटुंब प्रबोधन: कौटुंबिक मूल्यांचे संवर्धन आणि संस्कार.

स्व-आधारित जीवनशैली: भारतीय मूल्यांवर आधारित दैनंदिन जीवन.

नागरी कर्तव्य: शिष्टाचार आणि नागरिक म्हणून असलेल्या जबाबदाऱ्यांचा बोध.

ह.भ.प. भागवताचार्य नवनाथ महाराज नाईकवाडे यांनी सामाजिक सद्यस्थितीवर भाष्य करताना उद्भवलेल्या आव्हानांचा उल्लेख केला. या आव्हानांना तोंड देण्यासाठी अध्यात्मिक शक्ती किती प्रभावी ठरू शकते, यावर त्यांनी भाविकांना संबोधित केले.

हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष श्री. अजयजी सारंगकर यांनी भारतीय परंपरेचा सांस्कृतिक, धार्मिक आणि नैसर्गिक वारसा किती समृद्ध आहे, याची माहिती दिली.

श्री. सुदाम पालकर यांनी 'सांघिक गीत' सादर केले, तर सौ. स्नेहल केवडकर यांनी 'वैयक्तिक पद्य' सादर करून कार्यक्रमात चैतन्य भरले.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचलन श्री. संतोषजी पारगावकर यांनी केले. श्री. शंकरराव शितोळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले, तर श्री. श्रीराम शहापुरे यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

सौ प्रीती बागलाने यांनी उपस्थितांसाठी प्रसाद व्यवस्था केली.

सर्व व्यवस्था ,नियोजन व पाठपुरावा करण्यासाठी अध्यक्ष श्री अजय जी सारंगकर, श्री सुदाम पालकर,शंकर राव शितोळे, सौ प्रीती ताई बागलाने दत्ता सौंदतीकर,शरद जी येवतेकर, श्रीराम शहापुरे , श्री बळवंतराव देशमुख, यांनी आपला बहुमूल्य वेळ दिला.

या संमेलनासाठी तिरुपती वस्तीतील नागरिक बंधू भगिनी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## "डिजिटल अरेस्ट" फसवणूक प्रकरणातील ३ आरोपी अटकेत



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ |** सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी बीड सायबर पोलिसांनी मोठी कारवाई करत "डिजिटल अरेस्ट"च्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात तब्बल २३ लाख ४२ हजार ८८८ रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात उघड झाले आहे.

सायबर पोलीस ठाणे, बीड येथे दाखल गुन्ह्यानुसार परळी वैजनाथ येथील तक्रारदार सूर्यकांत निवृत्ती मुंडे यांना "डिजिटल अरेस्ट"ची भीती दाखवून ऑनलाइन माध्यमातून मोठी रक्कम उकळण्यात आली होती. या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता व माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासा दरम्यान पोलिसांनी आरोपींकडून ३ लाख रुपये रोख जप्त केले असून, आणखी ३.२० लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये गोठवले आहेत. आरोपी फसवणुकीतून मिळालेली रक्कम ऑनलाइन ट्रेडिंगच्या माध्यमातून स्वतःच्या फायद्यासाठी वापरत असल्याचेही निष्पन्न झाले आहे.

सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपींचा माग काढत जळगाव येथून त्यांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये प्रसन्न अजय कासट (वय ३१),स्वाती प्रसन्न कासट (वय २६), संकेत दीपक बेलदार (वय २२) यांचा समावेश आहे.या प्रकरणात आणखी काही आरोपी सहभागी आहेत का, तसेच इतर किती नागरिकांची फसवणूक झाली आहे, याचा सखोल तपास सध्या सुरू आहे. दरम्यान, बीड जिल्हा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, "डिजिटल अरेस्ट"सारख्या खोट्या धमक्यांना बळी पडू नये. पोलीस कधीही व्हिडिओ कॉलद्वारे अटक करत नाहीत. अशा प्रकारचे कॉल आल्यास त्वरित १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी. ही कारवाई पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

---

# बीड जलवाहिनी योजनेतील विलंबावर प्रशासन सतर्क; मुख्य अभियंत्यांकडून पाहणी

तभा. वृत्तसेवा

**बीड, ०३ एप्रिल |** बीड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी राबविण्यात आलेल्या ११४ कोटी रुपयांच्या अमृत अटल जलवाहिनी योजनेतील गोंधळ उघडकीस आल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अखेर सक्रिय झाले आहे. नगरपालिकेच्या विशेष सभेत ठेकेदाराविरुद्ध कारवाईचा ठराव मंजूर झाल्यानंतर मराठवाडा विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी बीड येथे भेट देत योजनेची प्रत्यक्ष पाहणी केली.



ही योजना

२०१७ मध्ये सुरू झाली असून दोन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, आठ वर्षांनंतरही शहरातील अनेक भागांमध्ये पाणी पोहोचलेले नाही. ४० किलोमीटर लांबीची मुख्य जलवाहिनी आणि २४१ किलोमीटरची अंतर्गत जलवाहिनी उभारूनही विस्तारीत भागातील जलकुंभ अद्याप कोरडेच असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर मनीषा पलांडे यांनी काडीवडगाव पंप हाऊस तसेच इट आणि नाळवंडी नाका येथील जलकुंभांची पाहणी केली. यावेळी आमदार विजयसिंह पंडित यांनी त्यांची भेट घेऊन ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचा निषेध नोंदवला. तसेच प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावर मुख्य अभियंता पलांडे यांनी उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. या पाहणीदरम्यान उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम, फारूक पटेल आणि अमर नाईकवाडे उपस्थित होते.

---

## श्री छत्रपती राजर्षी शाहू बँकेस 27 कोटी 44 लाखाचा भरघोस नफा"

तभा. वृत्तसेवा

**बीड |** जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेली श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि., बीड या बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असून या बँकेला ३१ मार्च, २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत एकुण रु.२७ कोटी ४४ लाखाचा भरघोस नफा बँकेने मिळवला आहे. बँकेच्या सातत्यपुर्ण आणि नियोजनबद्ध कामकाजामुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे.



A

बँकेचे महाराष्ट्रात एकुण ४६ शाखा असुन ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचे एकुण ठेवी रु. १५४८२३.६९ लक्ष, कर्ज रु.९२९२३.१७ लक्ष एकुण भाग भांडवल रु.४६१४.८५ लक्ष असुन, बँकेचे सभासद संख्या २११५१ व एकुण व्यवसाय रु. २४७७४६.८६ लक्ष साध्य केले असुन बँकेस ढोबळ नफा रु. २७४४.१७ लक्ष झाला आहे.

बँकेचा ग्रॉस NPA २.४९% असून बँकेचा नेट NPA गत चार वर्षे पासुन ०% (शुन्य टक्के) आहे. सर्व सभासद, कर्जदार, ठेवीदार, ग्राहक खातेदार, हितचिंतक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामुळे मिळाला असुन बँकेचे अध्यक्ष मा. इंजि. अजय अर्जुनराव पाटील, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळाच्या वतीने सर्वांचे आभार मानले आहे व तसेच अत्याधुनिक युगात डिजीटल व्यवहाराचा सर्व ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

---

## परळीत 6 एप्रिलपासून अतिक्रमणावर चालणार बुलडोझर ; पालिकेचा अल्टिमेटम

तभा. वृत्तसेवा

**बीड, ०३ एप्रिल |** परळी शहरातील मुख्य रस्ते मोकळेकरणे आणि वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी येत्या ६ एप्रिल पासून व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे. या संदर्भात नगरपरिषद प्रशासनाने अधिकृत नोटीस जारी केली असून, अतिक्रमणधारकांना एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून परळीतील मुख्य बाजारपेठ, रेल्वे स्टेशन रस्ता आणि वर्दळीच्या चौकांमध्ये वाढत्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना चालणे मुश्कील झाले आहे. पदपथावर थाटलेली दुकाने व ज्या नागरिकांनी सार्वजनिक जागा, रस्ते किंवा पदपथावर अतिक्रमण केले आहे, त्यांनी ते ५ एप्रिलपर्यंत स्वखुशीने काढून टाकावे. ६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या मोहिमेत जे अतिक्रमण काढले जाईल, त्याचा खर्चही अतिक्रमणधारकाकडून वसूल केला जाऊ शकतो. ही मोहीम कोणत्याही दबावाला बळी न पडता कडकपणे राबविली जाणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. एप्रिलपर्यंत स्वतःहून अतिक्रमणे हटवा; अन्यथा प्रशासकीय बळाचा वापर करून होणार कारवाईकच्च्या-रस्त्यावरील पक्क्या बांधकामांमुळे रुग्णवाहिकांनाही अडथळा निर्माण होत होता. कारवाईकडे लक्ष लागले आहे.

---

## सरपंच, सदस्यांच्या रिक्त जागांसाठी 28 एप्रिलला मतदान

तभा. वृत्तसेवा

**बीड, ०३ |** परळी वैजनाथ तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींमधील सरपंच आणि सदस्यांच्या एकूण १४ रिक्त जागांसाठी येत्या २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. निधन, अपात्रता, राजीनामा यांमुळे रिक्त जागांसाठी प्रक्रिया प्रशासनाकडून जाहीर करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ७ एप्रिलपासून सुरू होईल आणि १३ एप्रिलपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. १५ एप्रिल रोजी अर्जाची छाननी होणार असून, १७ एप्रिल रोजी दुपारी ३ नंतर उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले जाईल. १८ ते २७ एप्रिल या कालावधीत प्रचार रंगणार असून २८ एप्रिलला मतदान व २९ एप्रिल रोजी मतमोजणी पार पडेल. या प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, संबंधित गावचे ग्रामसेवक सहाय्यक अधिकारी म्हणून काम पाहतील. परळी तालुक्यातील सिरसाळा, मरळवाडी, जळगव्हाण, नागदा, आनंदवाडी, धर्मापुरी, दैठणाघाट, हेळंब, सारडगाव, वानटाकळी, नागपिंपरी, पांगरी, देशमुख टाकळी आणि जयगाव या ग्रामपंचायतींत ही निवडणूक होत आहे. यामध्ये सिरसाळा, मरळवाडी आणि जळगव्हाण येथे सरपंच पदासाठी, तर उर्वरित ठिकाणी सदस्य पदासाठी मतदान घेतले जाणार आहे.

---

## वाळूमाफियांकडून पोलिस अधिकाऱ्याला धक्काबुक्की

तभा. वृत्तसेवा

**बीड |** तालुक्यातील सिंदफना नदी पात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना अरेरावी करत धक्काबुक्की करण्यात आल्याची घटना खुडूस (ता. बीड) येथे घडली. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांनी महिलांसह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल हे आपल्या पथकासह ३१ मार्च रोजी रात्री खुडूस येथे गेले असता सिंदफना नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले. यावेळी हायवा चालकाकडे मालकाची चौकशी केली असता माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध प्राथमिक कारवाई केली.

दरम्यान, वाळूने भरलेला हायवा आणि जेसीबीच्या मदतीने सुरू असलेल्या उपशावर कारवाई करताना पोलिसांनी जेसीबी ताब्यात घेण्यासाठी पाठलाग केला. त्यावेळी जेसीबी मालकाने गावातील लोकांना बोलावून घेतले. जमावाने पोलिसांवर धावून जात अरेरावी केली तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

या घटनेप्रकरणी पोउपनि अर्जुन गोलवाल यांच्या फिर्यादीवरून किशोर लक्ष्मण डोईफोडे (वय २२, रा. ईट, ता. बीड), श्रीमंत खांडे, सिद्धेश्वर हाटवटे, संभाजी सिद्धेश्वर हाटवटे, ओम उर्फ आप्पासाहेब तसेच दोन महिलांसह एकूण नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राठोड करीत आहेत.

---

# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेस ३१ मार्च २०२६ अखेर २ कोटी ०५ लाखांचा नफा

## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** विश्वास, विकास आणि विनम्रता या त्रिसुत्रीनुसार कार्यरत असलेली दीनदयाळ नागरी सहकारी बँक मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात मागील २९ वर्षांत नांवारूपास आली आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणाऱ्या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२६ अखेर २ कोटी ०५ लाख रूपयांहून अधिकचा नक्त नफा झाला आहे. लवकरच बँक रूपये १००० कोटी एवढा एकूण व्यवसायाचा टप्पा पूर्ण करणार आहे. अशी माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२६ (आर्थिक वर्ष २०२५ - २०२६) अखेर आर्थिक वर्षासाठीचे अलेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे कोटीत आहेत.) एकूण संकलित ठेवी (६०९.८३), एकूण वितरीत कर्जे (३४६.६५), सी.डी. रेषो (५६.८४), बँकेने एकूण (९५६) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ०५ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे. तर अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ०.६४ टक्के एवढे आहे. (ता.क. - वार्षिक लेखा विवरण असल्याने उपरोक्त आकडेवारीत लेखापरीक्षणाप्रमाणे अंशतः बदल संभवतो.) दीनदयाळ बँकेचे संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे कार्यक्षेत्र आहे. तसेच बँकेच्या संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १८ एवढ्या शाखा कार्यरत असून अंबाजोगाई येथे बँकेचे अद्ययावत मुख्य कार्यालय हे स्वतःच्या मालकीच्या भव्य इमारती मध्ये कार्यरत आहे. बँकेच्या वतीने प्रतिवर्षी युगपुरूष स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. मागील २४ वर्षांपासून राज्यातील व राज्याबाहेरील अनेक नामवंतांनी आपल्या अमोघ वाणीने




अंबाजोगाईकरांना, ज्ञान, अध्यात्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक मेजवानी दिलेली आहे. याआधी वृक्षारोपण तसेच पाणी टंचाईच्या काळात बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला आहे. मुक्या जनावरांसाठी बँकेच्या वतीने पाणपोईची सुविधा करण्यात आलेली होती. मागील काही वर्षांत बँकेच्या मुख्यालयास सुप्रसिद्ध समाजसेवक, आर्थिक व व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील जाणकार, शिक्षण तज्ज्ञ, सिने व नाट्य कलावंत, लेखक, व्याख्याते, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्ती, आर.बी.आय.चे वरीष्ठ अधिकारी या मान्यवरांनी वेळोवेळी बँकेस भेटी देवून आपले अभिप्राय नोंदविले आहेत. कोविड सारख्या संकटकाळात तसेच सर्व ग्राहकांना सातत्यपूर्ण दर्जेदार व तत्पर बँकिंग सेवा दिल्याबद्दल ग्राहकांच्या वतीने बँकेस वेळोवेळी लेखी प्रशंसा व गौरवपत्र प्राप्त झालेले आहेत. तसेच दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात २०२३ साली मानाचा तुरा रोवला गेला आहे. तो म्हणजे बँकेच्या सर्वांगिण कार्याची दखल घेऊन सलग दुसऱ्या वर्षी ४०० ते ५०० कोटी रूपयांच्या ठेवी जमविलेल्या गटात दीनदयाळ बँकेस बँको ब्ल्यू रिबन या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने यापूर्वी गौरविण्यात आले आहे. गतवर्षी १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताचे औचित्य साधून समाजाप्रती सामाजिक उत्तरदायित्व आणि रक्ताची कमतरता भरून काढणे यासाठी बँकेच्या वतीने रक्तदान शिबिराचे तर लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंती जयंतीनिमित्ताचे औचित्य साधून परळी वेस (अंबाजोगाई) या ठिकाणी कॅन्सर निदान तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बँकेने नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. तत्पर व दर्जेदार बँकींग सेवा, सुविधा उपलब्ध करून देत दीनदयाळ बँकेने सहकार क्षेत्रात बिना संस्कार, नही सहकार हा संस्कार जोपासला आहे. एक परिवार म्हणून काम करताना विश्वास, विकास आणि विनम्रता हे ब्रीद घेऊन आश्वासक प्रगती साधली आहे. सध्या बँकेच्या मराठवाड्यात अंबाजोगाई, माजलगाव, परळी वैजेनाथ., पालम, परळी रोड, नांदेड, उदगीर, लातूर, देगलूर, परतूर, धारूर, नायगांव बाजार, परभणी, छत्रपती संभाजीनगर, अहमदपूर, जालना, बीड, सोनपेठ या ठिकाणी शाखा असून सुरूवाती पासूनच सामाजिक बांधिलकी मानून ही बँक आर्थिक क्षेत्रात कार्यरत आहे. संपूर्ण संगणकीकृत बँकींग सेवा दीनदयाळ बँक पुरविते, रूपे ए.टी.एम.ची तथा युपीआयची सेवा ही उपलब्ध आहे. बँकेच्या ए.टी.एम.मशीन मध्ये इतर सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे ए.टी.एम.कार्ड वापरता येतात. बँकेच्या सर्वांगीण विकासात बँकेच्या संचालिका तथा महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या खात्याच्या सन्माननीय कॅबिनेट मंत्री महोदया ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तर संचालक राजाराम धाट, संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किसन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे, ॲड.अशोक कुलकर्णी व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश शेळके यांचे तसेच आर.बी.आय.,सहकार खात्याचे आयुक्त, तथा निबंधक, उपनिबंधक, सहायक निबंधक तसेच बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आदींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वसमत शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी, कॉल सेवा ठप्प

## व्यापारी, पत्रकार, नागरिकांनी तहसीलदारांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ एप्रिल**

शहरातील वीज सेवेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचा आरोप करत पत्रकार, व्यापारी व नागरिकांनी एकत्र येत तहसीलदार शारदा दळवी यांना निवेदन सादर केले. विशेषतः फ्यूज कॉल सेवा पूर्णपणे ठप्प झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे. तत्काळ वीजपुरवठा सुरळीत करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

फ्यूज कॉल क्रमांकावर वारंवार संपर्क साधूनही कॉल लागत नाही; लागला तरी कोणताही प्रतिसाद मिळत नाही. अनेकदा संबंधित कर्मचाऱ्यांचे मोबाईल बंद किंवा 'स्विच ऑफ' अवस्थेत असतात. काही वेळा कॉल 'फॉरवर्ड'वर ठेवून जबाबदारी टाळली जात असल्याचा गंभीर आरोपही नागरिकांनी केला. वीज ग्राहकांच्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी असलेले अधिकारीच संपर्काबाहेर असतील, तर नागरिकांनी न्याय कुठे मागायचा? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. व्यापारी संघटनेने शहरात २४ तास कार्यरत स्वतंत्र फ्यूज कॉल नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. पूर्वी देशपांडे पेट्रोल पंप परिसरात असे कार्यालय सुरू होते, जिथे दिवसरात्र कर्मचारी उपलब्ध राहत होते. फोन सेवा खंडित झाल्यास नागरिकांना थेट कार्यालयात जाऊन तक्रार नोंदवण्याची सुविधा होती. मात्र सध्या संध्याकाळी ५ नंतर कार्यालय बंद राहत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय, शहरातील डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) देखभाल अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोपही करण्यात आला. फ्यूजमध्ये योग्य वायरचा अभाव, जुगाड पद्धतीने 'जम्पर' लावणे, नट-बोल्ट नसणे अशा गंभीर त्रुटींमुळे अगदी हलक्या वाऱ्यानेही वीजपुरवठा खंडित होत असल्याचे समोर आले आहे. मेंटेनन्सच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू असून प्रत्यक्षात काम शून्य आहे, अशी जोरदार टीका नागरिकांनी केली.

या वेळी पत्रकार फिरोज पठाण, रामू चौहान, शेख अफसर, हरनाम सिंह, श्रीधर वडवंते, शरीफ आलम, नागेश चौहान, अयूब पठाण, नवीद अहमद, करण बोबडे, नासर पठाण, शेख इलियास, मोइन कादरी यांच्यासह व्यापारी सुभाष लालपोतू, मन्मथ बेले, वसंत चेपुरवार, कापूस्करी, महागावकर, कुलथे, रहीम खान, मस्के आदी उपस्थित होते.

वीज विभागाने तातडीने फ्यूज कॉल सेवा सुरळीत करून २४ तास नियंत्रण कक्ष सुरू केला नाही, तर येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे.

# खटकाळी हनुमान मंदिरात किर्तनाने हनुमान जयंतीची सांगता

## महाप्रसादाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

हिंगोलीचे ग्रामदैवत आणि श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खटकाली येथील हनुमान मंदिरात यंदाचा हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात, चैतन्यमय आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण खटकली परिसर 'बजरंग बली की जय'च्या घोषाने दुमदुमून गेला होता. दि ३ एप्रिल रोजी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. हजारो भाविक या धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाले होते. दि ३ एप्रिल शुक्रवारी या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. बाबाराव महाराज दिग्रसकर यांचे सुश्राव्य कीर्तन लाभले. आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत महाराजांनी हनुमंतरायांच्या जीवनातील विविध पैलू उलगडून दाखवले. भक्ती, शक्ती आणि युक्तीचा संगम म्हणजे हनुमानजी, असे सांगत त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनादरम्यान भाविकांनी मंदिराचा परिसर अक्षरशः फुलून गेला होता.

सूर्यदेवाच्या उदयासोबतच हनुमान जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडला. यावेळी मूर्तीला अभिषेक, पूजन आणि महाआरती करण्यात आली. फुलांच्या आकर्षक सजावटीने मंदिराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. कीर्तन आणि दर्शनासाठी मंदिर समितीच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

महाप्रसाद: कीर्तनाच्या समाप्तीनंतर भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

खटकाली हनुमान मंदिर हे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. बाबाराव महाराजांच्या कीर्तनामुळे यावर्षीच्या उत्सवात एक वेगळीच आध्यात्मिक ऊर्जा पाहायला मिळाली, असे मत मंदिर समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी खटकली येथील ग्रामस्थ, तरुण मंडळी आणि मंदिर समितीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील भाविकांनी या सोहळ्याला उपस्थित राहून हनुमंतरायाचे दर्शन घेतले आणि प्रसादाचा लाभ घेतला.



बाबाराव महाराज दिग्रसकर यांच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. त्यानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मागील सप्ताहापासून येथील ग्रामदैवत खटकाळी दक्षिण मुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध

# चुकून दुसऱ्या फोन पे ला गेलेले ८० हजार रूपये सायबर सेलच्या प्रयत्नामुळे तत्काळ मिळाले परत, तक्रारदाराने मानले आभार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

दिनांक २६ मार्च २०२६ रोजी फिर्यादी इसम नामे अशोक सूर्यभान लठाड वय ४५ रा जांब ता पातुर जिल्हा अकोला यांनी आपल्या आईचे उपचार कामी वर्धा येथे त्यांच्या भावाच्या फोन पे नंबर वर ८० हजार रुपये पाठवले परंतु फोन पे मोबाईल नंबरचा एक नंबर चुकल्यामुळे सदरचे ८० हजार हे ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर परिसरातील एका महिलेच्या अकाउंटवर गेले.

सदरची चूक कळल्यानंतर फिर्यादी अशोक लठाड यांनी सदर महिलेला संपर्क केले असता सदर महिलेने मोबाईल नंबर स्विच ऑफ करून कोणताही प्रतिसाद दिला नाही.

त्यानंतर तक्रारदार यांनी सायबर सेल हिंगोली येथे येऊन घटनाक्रम सांगितला असता सपोनि घेवारे यांनी सदर मोबाईलचे डिटेल्स घेतले असता सदरची महिलाही ठाणे जिल्ह्यातील कल्याण उल्हासनगर परिसरातील असल्याचे निष्पन्न झाले.

सायबर सेल हिंगोली ने कल्याण तालुका पोलीस स्टेशन येथे संपर्क साधून सपोनि दत्तात्र्य नलावडे कल्याण तालुका पोलीस स्टेशन यांच्यामार्फतीने उल्हासनगर येथील सदर महिलेचा पत्ता मिळवला व चुकून गेलेले ८० हजार रुपये तात्काळ परत करा अन्यथा कायदेशीर गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्याबाबत बजावले असता सदर महिलेच्या नातेवाईकांनी तक्रारदार अशोक लठाड यांचे ८० हजार रुपये तात्काळ परत केले. आईच्या हॉस्पिटलच्या कामासाठी पाठवलेले पैसे अचानक दुसऱ्या अकाउंट वर गेले व ज्यांच्या अकाउंटवर गेले त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने तक्रारदार अशोक लठाड यांच्यासमोर आईच्या उपचाराचा प्रश्न निर्माण झाला होता परंतु सायबर सेलच्या मदतीने तक्रारदार यांचे पैसे तात्काळ परत मिळून दिल्याने तक्रारदार अशोक लठाड यांनी हिंगोली पोलीसांचे आभार मानले. सदरची कार्यवाही डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली श्री कमलेश मीना अप्पर पोलीस अधीक्षक हिंगोली मोहन भोसले स्थागुशा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे पोलीस अंमलदार प्रदीप झुंगरे, मारुती काकडे, प्रणिता मोरे यांनी केली.

## संक्षिप्त वृत्त

### मधोमतीचा लाचखोर मुख्याध्यापक निलंबीत

हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील लाख येथील मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एका शिक्षकाकडून संपूर्ण वर्षाच्या धरभाडे भत्त्यापोटी ५८ हजारांची रक्कम मिळाली होती. या रकमेतून ५० टक्के रक्कम दे असा तगादा मुख्याध्यापक संतोष कढणे याने शिक्षकाकडे लावला. सदर रक्कम न दिल्यास मुख्यालयी राहत नसल्याचा अहवाल शिक्षण विभागाकडे पाठविण्याची धमकीही दिली होती. त्यानंतर तडजोडी अंती २८ हजार रूपये देण्याचे ठरले होते. सदर रक्कम स्विकारतांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मुख्याध्यापक संतोष कढणे यास रंगेहात पकडले होते. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू हे करीत आहेत. यासंदर्भात उपाधिक्षक विकास घनवट यांनी सदरील मुख्याध्यापक कढणे यांचा अहवाल शिक्षण विभागाकडे सादर केला. त्या अहवालावरून कढणे यास निलंबीत करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी विपूल भागवत यांनी शाळा प्रशासनाला दिले होते. शाळा प्रशासनाने मुख्याध्यापक संतोष कढणे यास निलंबीत केले असून याबाबतचा अहवाल लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

### भगवान परशुराम परिक्रमेचे हिंगोलीत स्वागत



हिंगोली- अहिल्यानगर येथून प्रारंभ होऊन मध्य प्रदेशातील जानापावपर्यंत जाणाऱ्या भगवान परशुराम परिक्रमेचे हिंगोली जिल्ह्यात उत्साहात आगमन झाले. या परिक्रमेचे स्वागत महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने करण्यात आले. ब्रह्मवृंदाच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात भक्तिमय वातावरणात झाली. अहिल्यानगर येथील श्री चिरंजीव प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील विविध ब्राह्मण समाज संघटनांच्या संयुक्त विद्यमाने या परिक्रमेचे आयोजन करण्यात आले आहे. ब्राह्मण समाजासह खुल्या प्रवर्गातील, ज्यांना इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, अशा घटकांसाठी राज्य शासनाची स्वायत्त संस्था म्हणून अमृत कार्यरत आहे. या संस्थेमार्फत विविध विकासात्मक उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत. या प्रसंगी अमृत संस्थेचे हिंगोली जिल्हा उपव्यवस्थापक संजय मेथेकर यांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. उपस्थितांनीही मोठ्या श्रद्धेने पूजनात सहभाग घेतला. कार्यक्रमाला विविध संघटनांचे पदाधिकारी व ब्रह्मवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमृत संस्थेच्या वतीने जिल्हा व्यवस्थापक श्रीकांत धोतरे, उपव्यवस्थापक संजय मेथेकर तसेच लक्षित गटातील विविध संघटनांच्या अध्यक्षांनी परिक्रमा मंडळाचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थी व महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# कामगार कार्यालयासाठी आ. मुटकुळेंचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

हिंगोली शहरात कामगारांसाठी कामगार अधिकारी कार्यालयाची नितांत गरज असून सदरील कार्यालयासाठी जिल्हा प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिली आहे. या कार्यालयाच्या बांधकामासाठी निधीची उपलब्धता करून द्यावी या मागणीसाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केली आहे. सदरील कार्यालयाच्या बांधकामासाठी आता निधीही उपलब्ध होणार असून कामगारांसाठी स्वतंत्र कामगार अधिकारी कार्यालयाचे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहीती आ. मुटकुळे यांनी दिली आहे.

राज्य शासनाने कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. परंतु हिंगोलीत कामगार कार्यालय हे शहराच्या बाहेर असल्यामुळे कामगारांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याची दखल घेत आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केल्यानंतर प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असून या कार्यालयासाठी १५ कोटी निधी लागणार आहे. यासाठी कामगार कार्यालयाने प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केला असून या कामाला गती मिळाली आहे. लवकरच निधी उपलब्ध होणार असून कामगार कार्यालयाची सुसज्ज इमारत शहरात बांधण्यात येणार असल्याची माहीती आ. मुटकुळे यांनी दिली आहे.

# उन्हामुळे रोहीत्र जळण्याच्या घटनांमध्ये वाढ, महावितरण कार्यालयात नादुरूस्त रोहीत्रांचा खच

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**



जिल्ह्यात उन्हाचा पारा चाळीशी पार करत असतानाच ग्रामीण भागात शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशातच वाढत्या उष्णतेमुळे ग्रामीण भागातील विद्युत रोहित्र जळण्याचे प्रमाण प्रचंड वाढले असून, नवीन रोहित्र मिळवण्यासाठी हिंगोलीतील खटकाळी येथील महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या पिकअप वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत.

हिंगोली जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सध्या तापमानामुळे विजेचा वापर वाढला आहे. क्षमतेपेक्षा जास्त भार आणि वाढती उष्णता यामुळे गावागावांतील रोहित्र जळून खाक होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून अनेक गावे अंधारात असून, विहिरींना पाणी असूनही केवळ वीज नसल्याने पिके जळण्याची भीती निर्माण झाली आहे. हिंगोली येथील खटकाळी भागात महावितरणचे मुख्य कार्यालय व भांडार आहे. जळालेले रोहित्र बदलून नवीन मिळवण्यासाठी ग्रामीण भागातून शेतकरी स्वतः खासगी पिकअप वाहने भाड्याने घेऊन येत आहेत. परिस्थिती इतकी बिकट आहे की, खटकाळी परिसरात महावितरणच्या गेटपासून रस्त्यापर्यंत पिकअप वाहनांची गर्दी झाली असून, जणू 'पिकअपची जत्रा'च भरली की काय, असा भास होत आहे.

एकीकडे कडक ऊन आणि दुसरीकडे जळालेली डीपी; अशा दुहेरी संकटात आम्ही सापडलो आहोत. पिकअपचे भाडे भरून दोन-दोन दिवस इथे रांगेत उभे राहावे लागत आहे, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करत आहेत. रोहित्र उपलब्ध होण्यास होणारा उशीर आणि वाढती मागणी यामुळे शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे. महावितरणने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रोहित्रांचा पुरवठा तातडीने वाढवावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# नांदेड ईदगाह परिसरातील स्फोटप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**



नांदेड शहरातील जुन्या ईदगाह,वाजेगाव परिसरात घडलेल्या भीषण स्फोटप्रकरणी एनआयए किंवा सीबीआय मार्फत उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंचच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे करण्यात आली आहे.

दि.२१ मार्च रोजी सकाळी सुमारे ९ वाजता ईदच्या नमाजासाठी सुमारे ५० हजार हुन अधिक मुस्लिम बांधव, महिला व लहान मुले मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. याच वेळी वाजेगाव रोड परिसरात एका मोटारसायकलस्वाराचा भीषण स्फोट झाला. प्रत्यक्षदर्शी व व्हिडिओ पुराव्यांनुसार, संबंधित व्यक्तीने आपल्या शरीराला स्फोटके, काचांच्या बाटल्या व लोखंडी खिळे बांधले होते, ज्यामुळे स्फोट अधिक घातक ठरला.

प्राथमिकदृष्ट्या हा प्रकार संभाव्य दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न असल्याची गंभीर शक्यता नाकारता येत नाही. सुदैवाने हा स्फोट गर्दीत झाला नाही, अन्यथा शेकडो निरपराध नागरिकांचा जीव जाऊ शकला असता. याशिवाय, घटनास्थळी पोलिसांनी तातडीने अग्निशामक यंत्राद्वारे परिसर स्वच्छ केल्यामुळे महत्त्वाचे पुरावे नष्ट झाले आहे. यामुळे संपूर्ण घटनेच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवेदनात या प्रकरणाचा तपास एनआयए किंवा सीबीआयकडे सोपवण्यात यावा. सखोल फॉरेन्सिक व टॉक्सिकोलॉजिकल तपास करून अहवाल सार्वजनिक करण्यात यावा. तपास प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व जबाबदार पद्धतीने राबवण्यात यावी. या घटनेमागील सूत्रधार यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा.या घटनेची सत्यशोधन समिती तात्काळ स्थापन करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिल, हिंगोली चे राष्ट्रीय तथा संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हा अध्यक्ष शेख बासित महबूब,जिल्हा उपाध्यक्ष रवि जैस्वाल, शेख अवेज, शहर अध्यक्ष पठाण साजिद खान, जिल्हा प्रमुख महासचिव शेख शाहनवाज हुसेन, शेख नफिस पहेलवान, महासचिव सतीश लोणकर, सचिव आलम खान,पठाण रौफ खान, वि.स.अध्यक्ष शेख अफरोज फेरोज, राजकुमार जावळे, विशाल रणवीर मो.आमेर, मो.परवेज, मो.तौहिद, बागबान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गौण खनिज उत्खनन प्रकरणी ८५ लाखांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

कळमनुरी तालुक्यातील पिंपरी बुद्रुक येथील वाळू घाटावरील गौण खनिज उत्खनन प्रकरणात कंत्राटदारास तब्बल ८५ लाख रूपये दंडाची नोटीस उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी बजावली आहे.

या वाळू घाटाचा लिलाव सिध्दांत बिल्डींग मटेरियलचे सिध्दांत नरवाडे कुपटी यांनी घेतला आहे. या वाळू घाटाच्या लिलावामध्येच सर्व अटी व शर्ती नमुद करण्यात आल्या होत्या. त्यानुसार वाळू घाटातून ८९० ब्रास वाळू उपसा करणे अपेक्षित होते. मात्र वाळू घाटावर चार बोटीद्वारे वाळू उपसा करून चार जेसीबीद्वारे वाळू व मुरूम भरून ११ हायवाद्वारे वाहतूक केली जात असल्याची माहीती महसूल विभागाला मिळाली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना यांच्या पथकाने दि २७ मार्च रोजी रात्री छापा टाकला असता त्याठिकाणी काही हायवामध्ये मुरूम तर काही हायवामध्ये वाळू आढळून आली. त्यावरून मीना यांच्या पथकाने चार बोटी जाळून नष्ट केल्या तर ११ हायवा व चार जेसीबी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात जमा केल्या आहेत. याबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर केला. ८९० ब्रास वाळू उपसा करणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात १००० ब्रास वाळू उपसा केल्याचे अहवालात नमुद केले तसेच लिलावातील अटी व शर्तींचा भंग केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पोलीस भरतीत मुदखेड तालुक्यातील तब्बल १० तरुणांची निवड

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर 'खाकी'चे स्वप्न साकार



**सिद्धार्थ चौदंते**
**मुदखेड, दि. ३ एप्रिल -**

मुदखेड तालुक्यातील तरुणांनी आपल्या कष्टाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस भरती २०२६ मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तालुक्यातील तब्बल १० तरुणांची पोलीस दलात निवड झाल्याने मुदखेडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ग्रामीण भागातील या सुपुत्रांवर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरेगाव येथील युवक अनेक वर्षांपासून होमगार्ड म्हणून सेवा देणाऱ्या तरुणांनी खाकी वर्दीचे स्वप्न जिद्दीने पूर्ण केले आहे. विनोद केशव कोलते यांनी २०१७ ते २०२६ पर्यंत होमगार्ड म्हणून सेवा दिली. २०२४ मध्ये ते दरेगावचे पोलीस पाटील म्हणून विराजमान झाले आणि आता त्यांची निवड नांदेड पोलीस दलात झाली आहे.तसेच दरेगाव वाडी येथील साहेबराव महाजन २०१९ पासून होमगार्ड म्हणून कार्यरत असणाऱ्या साहेबराव यांचीही नांदेड पोलीस दलात निवड झाली आहे.

गोविंद अशोक मुंगल २०१९ पासून होमगार्ड म्हणून सेवा देणाऱ्या गोविंद यांची चंद्रपूर जिल्हा पोलीस पदी निवड झाली. एकाच गावातून ५ शिलेदार

रेल्वे स्टेशन पाथरड या एकाच गावाने या भरतीत बाजी मारली आहे. या मध्ये पवन गोदने(पुणे पोलीस) कैलास श्रीराम एडके(नांदेड पोलीस)अनिल संभाजी लोकरे (अकोला पोलीस) लक्ष्मण चंपती पुयड (बुलढाणा पोलीस) व्यंकट कदम(धुळे पोलीस)मुलींचाही टक्का कायम मौजे दरेगाव येथील शिवानी माधवराव पा. गाढे (नांदेड पोलीस) हिनेदेखील पोलीस भरतीत यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच चिलपिंपरी येथील परमेश्वर दिगंबर सूर्यवंशी यांची (धाराशिव पोलीस) पदी निवड झाली आहे. जिल्हा परिषद शाळेतून सुरुवात करत होमगार्डची जबाबदारी सांभाळून पोलीस होण्यापर्यंतचा या तरुणांचा प्रवास तालुक्यातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या सर्व यशस्वी उमेदवारांचे मुदखेड तालुक्यातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांकडून कौतुक होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

**आईच्या कष्टाचे चीज झाले : परमेश्वर सुर्यवंशी**

तालुक्यातील चिलपिंपरी येथील एका सामान्य कुटुंबातील जिद्दी तरुण परमेश्वर दिगंबर सूर्यवंशी यांची नुकतीच धाराशिव पोलीस पदी निवड झाली आहे.वडिलांचे छत्र लहानपणीच हरवलेले असतानाही परमेश्वरने चिकाटीने अभ्यास केला.आई लक्ष्मीबाई सूर्यवंशी यांनी शेतात मोलमजुरी करून मुलाच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टाचे आज चीज झाले आहे.माझ्या यशाचे पूर्ण श्रेय आई, आणि मामा यांना आहे,अशा शब्दांत परमेश्वरने आपल्या भावना व्यक्त केल्या. एका सामान्य परिस्थितीतून मेहनतीच्या जोरावर मिळवलेले हे यश गावातील इतर तरुणांसाठी दिशादर्शक ठरणार आहे.मी काहीही कष्ट करेल पण माझ्या मुलाला अधिकारी करणारच, ही आईची जिद्द अखेर सार्थ ठरली.

# चार वर्षांत माहूर गडाचा चेहरामोहरा बदलणार




**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३ एप्रिल -**

साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण पीठ असलेल्या माहूर गडाच्या सर्वांगीण विकासासाठी आराखडा तयार करण्यात आला असून, काही तांत्रिक अडचणी असल्या तरी पुढील चार वर्षांत माहूर गडाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार, असा विश्वास आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला.

तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीच्या कामाचा शुभारंभ गुरुवारी (दि. २ एप्रिल) पांडव लेणी परिसरातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेजवळ उत्साहात पार पडला. आमदार केराम यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप साईनाथ महाराज वसमतकर होते.

यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, तहसीलदार अभिजित जगताप, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, उपनगराध्यक्ष नाना लाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता भिसे, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार, बाबू केंद्रे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नगरसेवक गोपू महामुने यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

विकासकामांमध्ये कोणताही पक्षपात न करता सर्व भागांचा समतोल विकास करण्यावर भर दिला असल्याचे आमदार केराम यांनी नमूद केले. शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विविध योजनांतून निधी आणण्यात येत असून, प्रलंबित कामांना गती देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी मांडलेल्या मटण मार्केट, वाढीव पाणीपुरवठा योजना तसेच क्रीडा संकुलाला जोडणाऱ्या रस्त्यासाठी आवश्यक निधी मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील काळातही विकासकामांमध्ये राजकारण न करता सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेभरे यांनी केले. तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिर्शीकर यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन एस. एस. पाटील यांनी केले.

यावेळी माजी सभापती संजय राठोड, हाजी उस्मानखान चांदखान, अनिल वाघमारे, प्रा. राजेंद्र केशवे यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## येरगी येथे आरोग्य शिबिरात २९८ लोकांची मोफत तपासणी

**देगलूर**-मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तालुक्यातील चालुक्यकालीन येरगी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यात एकूण २९८ जणांची मोफत तपासणी करण्यात येऊन यामधून २७ जणांची मोतीबिंदू साठी तर हर्निया व अपेंडिक्स साठी एकूण ११ जणांची निवड करण्यात आली आहे. सदरील शिबिराचे उदघाटन उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. संजय लाडके यांच्या हस्ते सरस्वती मातेच पूजनाने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील येरगीकर, उदगीर येथील लायन्स नेत्र रुग्णालयचे डॉ.प्रशांत गायकवाड, डॉ.प्रतिक जाधव, डॉ.संजय इंगळे, आदी उपस्थित होते. उदघाटन कार्यक्रमानंतर नेत्र विभाग, अन्य विभागांची निर्मिती करण्यात आली होती. यामध्ये नेत्र रोग तपासणी कक्ष, जनरल तपासणी कक्ष, बि.पी. शुगर तपासणी कक्ष, औषध वाटप कक्ष, बीपी तपासणी,सामान्य आरोग्य तपासणी, स्त्री रोग विभाग, नुसार रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधी देण्यात आले. सदरील शिबिरात एकूण २९८ महिला व पुरुषांची तपासणी करण्यात आली. उदगीर येथील लायन्स नेत्र रुग्णलयाकडून नेत्र तपासणी करून त्यामधून एकूण २७ नागरिकांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात येऊन उदगीर येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. तसेच यापैकी ११ जणांची हर्निया व अपेंडिक्स साठीच्या शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आले असून त्यांच्यावर देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. सदरील निशुल्क आरोग्य शिबीरात डॉ. शेख शाहनवाज, डॉ.फारूखी मॅडम, डॉ. किरण ठाकरे मॅडम, राजेश्वर मटंगे, विनायक पाटील, श्रीमती शेख शरीफा, आशाताई कालिंगवार व भुरळे, आदींनी नागरिकांची तपासणी करून नागरिकांना सेवा दिली. या प्रसंगी तंटामुक्त अध्यक्ष सायलु कांबळे, ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार, अशोक बरसमवार, सुरेश सोमवार, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गजानन भोकसखेडे, माजी सरपंच चांदु कांबळे, दशरथ काबळे, अंगणवाडीचे हाणमाबाई बरसमवार, गंगामणी दारलावार, शितल मटपती, नागमणी बरसमवार, मजुळा सिलमकुटवार, बालिका पंचायत राज चे ग्रामपंचायत सदस्य महादेव कुंचगे, मोनिका माळगे, रुक्मिणी भुरूळे, रितिका चिटकुलवार, शिबीर यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील, इरवंत कालिंगवार, माधव ईज्जरवार, मल्लिकार्जुन मटपती, प्रभाकर वाघमारे, माधव बागेवार, सर्व ग्राम पंचायत सदस्य, बालिका पंचायत राज, आरोग्य कर्मचारी आणि गावकऱ्यांनी परिश्रम केले. प्रास्ताविक संतोष पाटील येरगीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनिका माळगे यांनी केले तर आभार बालिका पंचायत राजचे रुक्मिणी भुरळे यांनी मांडले.

## खतगांव आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका गंगासागर मॅनेवार सेवानिवृत्त

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या आरोग्य सेविका श्रीमती गंगासागर विश्वनाथ मॅनेवार(रा.मुखेड) हे नियत वयोमानानुसार मंगळवार दि.३१ मार्च रोजी तब्बल ३८ वर्ष सेवा देत अखेर सेवानिवृत्त झाल्या आहेत.मंगळवारी सकाळी ११ वाजता त्यांचा मान्यवर अधिकाऱ्यांच्या वतीने यथोचित कपडेरूपी आहेर भेट देऊन सत्कार करीत शुभेच्छां देण्यात आल्या. येथील आरोग्य सेविका मॅनेवार या खतगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात ८वर्षांपासून कार्यरत होत्या.दि.३० जानेवारी १९८८ साली कुरूळा,ता. कंधार केंद्रात आरोग्य सेविका म्हणून नियुक्ती झाली.त्यानंतर सावरगांव, ता.मुखेड,इवळेश्वर,ता.माहूर येथेही त्यांनी सेवा दिलेली होती.आपल्या सेवाकाळात त्यांनी वरिष्ठांकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार विविध रूग्णांना वेळोवेळी सेवा दिली आहे.संवादी आणि हजरजबाबी या गुणांमुळे कर्मचारीवर्ग व महिला रूग्णांना आपलेसे करण्यात त्या यशस्वी झालेल्या आहेत.गरजू,समस्याग्रस्त रुग्णांची सेवा करण्यात त्या नेहमी अग्रेसर असत.सेवानिवृत्त गौरव सोहळ्यात त्या भावूकपणे आपल्या दीर्घ संवेदनांना हळूवार मांडत सेवेप्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कार्यक्रम अध्यक्षा म्हणून खतगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.निता भावठाणकर,प्रमुख अतिथी केंद्रातील डॉ.वैभव रामपुरे,औषध निर्माण अधिकारी लक्ष्मण अनपलवार, कर्मचारी मारोती पेंटे सह प्राथमिक आरोग्य केंद्र व परिसरातील उपकेंद्रातील कर्मचारीवर्ग,प्रतिष्ठित नागरिक यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## मौखिक आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**नांदेड** -शहरातील सुमन बालगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या मौखिक आरोग्य शिबिरात एकूण २६ मुलींची तपासणी व उपचार करण्यात आले. दिनांक २० मार्च ते २० एप्रिल हा महिना मौखिक आरोग्य महिना म्हणून साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दि. २ एप्रिल रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम बुट्टे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राष्ट्रपाल औसारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमन बालगृह येथे दंतशल्य चिकित्सक डॉ. कांतीलाल इंगळे, दंत महाविद्यालयातील डॉ. राजेश कुमार, डॉक्टर स्नेहल चिंचोळे यांनी मौखिक शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात एकूण २६ मुलींची तपासणी करून उपचार करण्यात आले. तसेच दंत स्वच्छ करण्याची पद्धत, हात धुण्याची योग्य पद्धत याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. आरोग्य शिक्षणाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना यावेळी शैक्षणिक साहित्याचे देखील वाटप करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी दंत महाविद्यालयाचे अंतरवासिता डॉ. दत्ता जाधव, विशाल पाटील यांनी परिश्रम घेतले.




# महिला सक्षमीकरण चळवळ यशस्वी करण्यासाठी पुरुषांच्या विचार व वर्तनात बदल आवश्यक : प्रा.डॉ.बा.रा.कत्तुरवार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ३ एप्रिल -**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर देशात सांसदीय लोकशाही व लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला.

राज्यघटनेनुसार कायद्याचे राज्य, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, दर्जा व संधीची समानता , धर्मनिरपेक्षता , समाजवाद , इत्यादी आदर्श मानवी लोकशाही मुल्यांचा स्वीकार करण्यात आला. आदर्श स्वरुपाची शासन व प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. या शासन व प्रशासन व्यवस्थेत निसर्गतः लोकसंख्येत ५० टक्के वाटा असलेल्या महिलांना दर्जाची व संधीची समानता या तत्वानुसार आर्थिक,सामाजिक,राजकीय, प्रशासकीय व व्यावसायिक क्षेत्रात समानता प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु पुरुषप्रधान संस्कृती प्रभावामुळे महिला व मागासवर्गीय या दोन्ही समाज घटकाला उपेक्षित व वंचित जीवन जगावे लागत होते. अलीकडच्या काळात शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासाला निर्णायक वळण प्राप्त झाले आहे. गावच्या ग्रामपंचायत सदस्यापासून ते देशाच्या सर्वोच अशा महामहीम राष्ट्रपतीपदापर्यंत महिलांनी गरुडझेप घेतली आहे.

महिला सक्षमीकरण चळवळ अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी पुरुषांच्या विचार व वर्तनात बदल आवश्यक आहे,असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख प्रा.डॉ.बा.रा.कत्तुरवार यांनी केले आहे. ते महाराष्ट्र उद्योजगता विकास केंद्र महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ व जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांच्यावतीने देगलूर येथे आयोजित केलेल्या सेंसीटायझेशन आणि क्षमता वृद्धीवर आधारित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीस्थानी कार्यशाळा समन्वयक शीतल अजित वरणे ह्या होत्या.

सर्व महिला वर्गाला शासन, प्रशासन व उद्योग क्षेत्रातील दुहेरी जबाबदारी पार पाडवी लागते. एक म्हणजे कौटुंबिक आणि दुसरी म्हणजे शासन, प्रशासन व उद्योग क्षेत्रातील जबाबदारी होय. महिला अधिकारी , कर्मचारी व उद्योजक वर्गाला पुरुषांच्या तुलनेत अधिक संघर्ष व एक प्रकारे तारेवरची कसरत करावी लागते असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी तालुक्यातील नवोदित महिला उद्योजक उपस्थित होते.

# अर्धापूरच्या 'त्या' १०२ शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांचे कार्यवाहीचे निर्देश

## खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ एप्रिल -**

सन २०२५-२६ मधील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या अर्धापूर येथील १०२ शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरींना मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोजगार हमी योजना विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहेत. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीजया चव्हाण यांनी मुंबई येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते.

ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार, अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करण्यात आले होते. यात खचलेल्या किंवा बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी 'मनरेगा'च्या माध्यमातून मदत देण्याची तरतूद होती. अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील १०२ बाधित शेतकऱ्यांनी यासाठी रीतसर अर्ज करून पंचनामेही पूर्ण केले होते. मात्र, 'मनरेगा' ही योजना केवळ ग्रामीण क्षेत्रापुरती मर्यादित असल्याने आणि अर्धापूर हे नगरपंचायत (शहरी) क्षेत्र असल्याने, तांत्रिक कारणास्तव या शेतकऱ्यांची मदत प्रलंबित राहिली होती.

बाधित शेतकरी नगरपंचायत हद्दीतील असला तरी त्याचे नुकसान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांइतकेच गंभीर आहे. केवळ तांत्रिक निकषांमुळे हे शेतकरी मदतीपासून वंचित राहणे अन्यायकारक ठरेल. राज्य सरकारने विशेष पॅकेजच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भक्कम आधार दिला आहे. अर्धापूरचे १०२ शेतकरी त्या मदतीपासून वंचित राहणे योग्य ठरणार नाही, असे खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नमूद केले. या बाबीची मुख्यमंत्र्यांनी तातडीने दखल घेत रोहयो विभागाला कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

# तुकाराम मुंढे यांची बदली त्वरित रद्द करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ एप्रिल -**

मंत्रालय, मुंबई येथील दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच करण्यात आलेली अचानक बदली ही नियमबाह्य असून, लाखो दिव्यांगांवर अन्याय करणारी आहे, असा आरोप सकल दिव्यांग संघटनांनी केला आहे. या निर्णयाविरोधात सर्वसमावेशक दिव्यांग सशक्तीकरण असोसिएशन, महाराष्ट्रच्या वतीने मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री सचिवालयात निवेदन देत ठिय्या आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तुकाराम मुंढे हे कर्तव्यदक्ष व भ्रष्टाचारविरोधी अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी दिव्यांग कल्याण विभागात अल्पावधीतच बोगस दिव्यांग, बोगस कर्मचारी आणि बोगस संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारावर आळा घालण्यास सुरुवात केली होती. या कारवाईमुळे काही स्वार्थी घटक अस्वस्थ झाले असून त्यांच्या दबावामुळेच ही बदली करण्यात आल्याचा गंभीर आरोप संघटनेने केला आहे.

राज्य शासन दिव्यांगांसाठी विविध योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करत असले तरी त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे वास्तव आहे. अशा परिस्थितीत पारदर्शक व कठोर प्रशासन देणाऱ्या अधिकाऱ्याची बदली करणे हे दुर्दैवी असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

ही बदली तात्काळ रद्द करून त्यांना नियमानुसार किमान तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

या वेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल साळवे यांच्यासह मिलिंद सितळे, माधव हिवराळे, शिवराज बंगरवार,आतिख हुसेन, कार्तिक कुमार भरतिपुरम, सय्यद आरिफ, नागनाथ कामजळगे, आरूष साळवे,हसन खान इस्माईल खान, रमेश लंकाढाई, महंमद मोहसीन कादरी, नारायण ताडलवार, मोहम्मद सोफियान, मोहम्मद मोहसीन, शेख आलीम, मोहम्मद अब्दुल माजीद रज्जाक बागवान, साईनाथ काळे, महंमद शकिल अहेमद, जफर खान, संतोष रामशेटवार, संभाजी सुपारे, दिगांबर सोनटक्के, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ने. सु. बो. महाविद्यालयात बी.कॉम तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ एप्रिल -**

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथील वाणिज्य विभागाच्या वतीने बी.कॉम तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनात नियोजनाचे महत्त्व अधोरेखित केले. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य नियोजन आवश्यक असते, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्या डॉ. कल्पना कदम यांनी आपल्या मनोगतात वाणिज्य विषयाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

या कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड, उपप्राचार्या डॉ. कल्पना कदम तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. शिवदत्त विभुते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय डॉ. ललिता यडपलवार, डॉ. अतिष राठोड, प्रा. सारिका लहानकर, प्रा. किरण वाघमार आदी प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# नायगावातील कृषी सहाय्यकाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; शेतकऱ्यांत संताप

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. ३ एप्रिल -**

तालुक्यातील कृषी विभागातील एका कृषीसाहाय्यकाच्या निष्क्रिय व हलगर्जी कामकाजामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शासकीय कृषी योजनांची माहिती वेळेत व स्पष्टपणे दिली जात नसल्याने अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप होत आहे.

पीक विमा, ठिबक व तुषार सिंचन, बी-बियाणे अनुदान तसेच कृषी यंत्रसामग्री योजनांसाठी अर्ज करूनही योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याची तक्रार आहे. कागदपत्रांमध्ये त्रुटी काढून अर्ज प्रलंबित ठेवले जात असून शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत. परिणामी, वेळ आणि



आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर संबंधित कृषीसाहाय्यकाची तात्काळ बदली करून विभागीय चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# शनिवारी 'तेरे सूर और मेरे गीत' कार्यक्रमाची मेजवानी

## गायिका मेघा संजीवन यांच्यासह नांदेड, मुंबई आणि नागपूरच्या कलावंतांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ एप्रिल -**

येथील प्रसिद्ध गायिका मेघा संजीवन यांच्या 'तेरे सुर और मेरे गीत' (पर्व सहा) या सांगितीक कार्यक्रमाची नांदेडकरांना शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी मेजवानी मिळणार आहे. या कार्यक्रमात नांदेडमधील कलावंतांसह मुंबई आणि नागपूरच्या कलावंतांचा सहभाग असणार आहे. यात १६ तास सलग गायनाचा विश्वविक्रम केलेले प्रसिद्ध गायक संतोष कपारे यांचाही समावेश आहे.

येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडियम जवळ) येथे होणार असलेल्या या कार्यक्रमास विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, महापौर कविता संतोष मुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अजरामर गायक लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्यासह दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना समर्पित या कार्यक्रमात मो. रफी, लता मंगेशकर यांच्यासह किशोरकुमार, आशा भोसले, सुमन कल्याणपूर यांच्यासह विविध गायकांनी गायलेली गीते या कार्यक्रमात सादर होणार आहेत.

या कार्यक्रमात नांदेडच्या शास्त्रीय आणि सुगम संगीतातील प्रसिद्ध गायिका मेघा संजीवन यांच्यासह, सलग १६ तास गाण्याचा विश्वविक्रम करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड नाव नोद असणारे मुंबईतील प्रसिद्ध गायक संतोष कपारे, दैनिक गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील, इंजि. जयचंद्र तत्तापुरे, सावजी दुमाने, मयूर सावजी हे विविध गीते सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबईचे प्रसिद्ध निवेदक नासिर खान हे करणार आहेत. त्याचबरोबर खास अशी म्युझिशियन टीम या कार्यक्रमात असणार आहे. ज्यात अरविंद उपाध्याय (नागपूर), किरण यादव (मुंबई), चंद्रशेखर सावंत (मुंबई) यांच्यासह चेतन चित्ते. रतन चित्ते, शुद्धोधन कदम, स्वप्निल धुळे, किशोर आवटे आणि हंसराज चित्ते हे अनुभवी वादक कार्यक्रमाला संगीत देणार आहेत. 'तेरे सुर और मेरे गीत' या कार्यक्रमात विविध वाद्य खास आकर्षण असणार आहेत. ज्यात सॅक्सोफोन, बासरी, गिटार यासह विविध वाद्यांचा समावेश असणार आहे.

या कार्यक्रमात सर्वांना निःशुल्क प्रवेशिकेद्वारे प्रवेश राहणार आहे. या कार्यक्रमास सर्व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांगितीक मेजवानीचा आनंद घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाच्या निर्मात्या आणि प्रमुख गायिका मेघा संजीवन यांच्यासह संयोजक संजीवन गायकवाड, सौ. नंदा गायकवाड यांनी केले आहे.

## सॅमसंगकडून आकर्षक ऑफर्स

मुंबई: सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलेक्सी ए सिरीजमधील नवीन स्मार्टफोन्स गॅलेक्सी ए57 ५जी आणि गॅलेक्सी ए37 ५जी लाँच केले. गॅलेक्सी ए सिरीज फोटोग्राफी, कार्यक्षमता, एआय-सक्षम दैनंदिन वैशिष्ट्ये आणि टिकाऊपणाला प्राधान्य देणाऱ्या तरूण वापरकर्त्यांसाठी डिझाइन करण्यात आली आहे. गॅलेक्सी ए57 ५जी अॅल्युमिनिअम फ्रेमसह येतो आणि जाडी फक्त ६.९ मिमी असण्यासह हा आतापर्यंतचा सर्वात सडपातळ गॅलेक्सी ए सिरीज डिवाईस आहे. गॅलेक्सी ए57 ५जी वरील अत्यंत स्लिम बेझल्स डिवाईसचे व्हिज्युअल संतुलन सुधारतात आणि अधिक सर्वोत्तम व सुस्पष्ट व्युईंग अनुभव देतात.

## आईकू 15 एपेक्स रंगात लॉन्च, बेस्ट-इन-क्लास 2केडिस्प्लेसह

नवी दिल्ली, 1 एप्रिल 2026: आईकू या हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँडने आज आईकू 15 एपेक्स लॉन्च केल्याची घोषणा केली आहे. हा फ्लॅगशिप आईकू 15 चा नवीन कलर व्हेरिएंट आहे. आईकू 15 च्या यशावर आधारित, एपेक्स व्हेरिएंट आकर्षक डिझाइनसह फ्लॅगशिप अनुभव अधिक उंचावतो आणि परफॉर्मन्स व अॅडव्हान्स्ड डिस्प्ले इनोव्हेशनमध्ये आईकू ची आघाडी मजबूत करतो. आईकू 15 एपेक्स आपल्या बोल्ड आणि आकर्षक डिझाइनमुळे वेगळी ओळख निर्माण करतो. "एपेक्स" म्हणजे सर्वोच्च स्तराची संकल्पना—जी ताकद, अचूकता आणि आत्मविश्वास दर्शवते. याच्या बॅक पॅनेलमध्ये इंडस्ट्री-फर्स्ट डायनॅमिक पार्टिकल डिझाइन आणि लेझर होलोग्राफिक टेक्नॉलॉजी दिली आहे, जी प्रकाशानुसार बदलत 3D सारखा फ्लुइड इफेक्ट देते, त्यामुळे फोन अधिक जिवंत वाटतो.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने 4,06,081 युनिट्स विक्रीची नोंद

छत्रपती संभाजीनगर: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आर्थिक वर्ष आर्थिक वर्ष 25-26 मधील विक्री कामगिरी जाहीर केली असून 4,06,081 युनिट्स विक्री नोंदवली आहे, जी आर्थिक वर्ष 24-25 मधील 3,37,148 युनिट्सच्या तुलनेत 20% वाढ दर्शवते. ही वाढ ग्राहकांचा मजबूत विश्वास, संतुलित उत्पादन पोर्टफोलिओ आणि भविष्यकालीन मोबिलिटी उपायांवर टोयोटाचा भर याचे प्रतिबिंब आहे. कंपनीने आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यातही सकारात्मक कामगिरी नोंदवली असून मार्च 2026 मध्ये 37,194 युनिट्स विक्री झाली, जी मार्च 2025 मधील 30,043 युनिट्सच्या तुलनेत 24% वाढ दर्शवते. आर्थिक वर्ष 2024-25 च्या तुलनेत 2025-26 मध्ये टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. देशांतर्गत विक्री 309,508 युनिट्सवरून 367,107 युनिट्सपर्यंत वाढली असून यात 19% वाढ नोंदवली गेली आहे.

## सिब्लिंग्स डे निमित्त कलाकारांकडून भावंडांच्या नात्याचा भावनिक कनेक्ट अधोरेखित

छत्रपती संभाजीनगर – सिब्लिंग्स डेच्या पार्श्वभूमीवर &TV वरील "घरवाली पेडवाली" आणि "भाभीजी घर पर हैं 2.0" या मालिकांतील कलाकारांनी भावंडांच्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. सीरत कपूर यांनी त्यांच्या भावाला करिअरमधील 'स्ट्राँग सपोर्ट सिस्टिम' म्हटले, तर विदिशा श्रीवास्तव यांनी बहिणीसोबतचे नाते 'इमोशनल स्ट्रेंथ' असल्याचे सांगितले. या नात्यातील विश्वास, साथ आणि परस्पर समज ही जीवनातील महत्त्वाची 'इमोशनल व्हॅल्यू' असल्याचे त्यांनी नमूद केले. या अनुभवांतून भावंडांचे नाते हे केवळ कौटुंबिक नसून आयुष्यभर साथ देणारे 'लाईफ-लाँग पार्टनरशिप' असल्याचे स्पष्ट होते.

## 'जाने अनजाने हम मिले'मध्ये तुरुंग ट्रॅकने वाढवली इमोशनल इंटेन्सिटी

छत्रपती संभाजीनगर – झी टीव्हीवरील "जाने अनजाने हम मिले" मालिकेत सध्या सुरू असलेला तुरुंग ट्रॅक कथानकाला 'हाय इमोशनल इंटेन्सिटी' देत आहे. राघवच्या भूमिकेत असलेल्या भरत अहलावतने या सिक्वेन्सला 'मेंटली चॅलेंजिंग' असल्याचे सांगितले. शारीरिक आणि भावनिक संघर्ष एकत्र दाखवणाऱ्या या ट्रॅकमुळे व्यक्तिरेखेचा 'डेप्थ' अधिक ठळक झाला आहे. किर्ती जिवंत असल्याचा ट्विस्ट आणि तिचा शारदासोबतचा कट उघड झाल्याने कथानकात 'हाय-स्टेक्स ड्रामा' निर्माण झाला आहे. आता रीत सत्य बाहेर आणण्यासाठी पुढाकार घेत असल्याने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

## &TV कलाकारांनी सांगितले त्यांचे आवडते समर रिफ्रेशमेंट्स; नैसर्गिक पेयांवर भर

छत्रपती संभाजीनगर: उन्हाळ्यात शरीर हायड्रेटेड ठेवणे आणि ताजेतवाने राहणे महत्त्वाचे असल्याचे सांगत &TV वरील कलाकारांनी त्यांच्या आवडत्या समर रिफ्रेशमेंट्स शेअर केल्या आहेत. 'घरवाली पेडवाली' मालिकेतील प्रियंवदा कांत यांनी उन्हाळ्यात नारळपाणी, लिंबूपाणी, ताक आणि हंगामी फळांना प्राधान्य देत असल्याचे सांगितले. शूटदरम्यान त्या सॉफ्ट ड्रिंक्स टाळून आमपन्हे, फ्रूट स्मूदी आणि नैसर्गिक पेये घेतात. 'भाभीजी घर पर हैं 2.0'मधील विदिशा श्रीवास्तव म्हणाल्या की, त्या दिवसभर भरपूर पाणी पितात आणि त्यात पुदीना किंवा काकडी घालतात.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य संघबंदी नंतर देशभर व देशाबाहेर विस्तारले.

# लाखो सेवा प्रकल्प व संघ प्रेरित संस्था मोठ्या प्रमाणात कार्यरत : योगेश थत्ते

पुणे (प्रतिनिधी) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तत्कालिन केंद्र शासनाने लोकशाहीची तत्वे झुगारून बंदी आणली,लाखो स्वयंसेवकांना तुरुंगात विनाकारण डांबले परंतु त्या काळात व नंतर संघाचे काम विस्तारले गेले.नवनवीन सेवा प्रकल्प सुरू केले गेले.शाखांची संख्या वाढली,हजारो नवतरुण संघ कामात व सेवा प्रकल्पामध्ये जोडले गेले" असे प्रतिपादन इतिहास प्रबोधन समिती चे प्रदेश संयोजक योगेश थत्ते यांनी केले.



कर्वेनगर माहेश्वरी मंडळ आयोजित सकल हिंदू समाज तर्फे सहवास वस्तीमधील विराट हिंदू मेळाव्यात योगेश थत्ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते ते पुढे म्हणाले,संघ शताब्दी वर्ष साजरे करतांना संघाने हिंदू संघटन बरोबरच शाखा विस्तार तसेच समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन विविध सामाजिक कार्यावर जास्त काम करायचे ठरवले आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक जनकल्याण समिती द्वारा राज्यामध्ये समाजातील अनेक वंचित नागरिकांसाठी सेवा प्रकल्प चालवित आहे.संघाच्या विविध क्षेत्रात जसे विश्व हिंदू परिषद,विद्यार्थी परिषद,भारतीय मजदूर संघ,राष्ट्रीय सेविका समीर,वनवासी कल्याण आश्रम, विश्व विभाग,पूर्वांचल विकास,सामाजिक समरसता मंच ,गो-सेवा प्रकल्प,ग्रामविकास प्रकल्प,अखिल भारतीय पूर्व सैनिक परिषद,अधिवक्ता परिषद,भारत विकास परिषद,क्रीडा भारती,विद्या भारती,सेवा भारती,संस्कार भारती,उद्योजक भारती,संस्कृत भारती,सेवा सहयोग,भारत विकास परिषद,दिव्यांगासाठी काम करणारी सक्षम,सेवा आरोग्य फाऊंडेशन,स्वदेशी जागरण मंच,दुर्गा वाहिनी अशा विविध संस्था व संघटनाद्वारे अनेक क्षेत्रात कार्यरत असून या शताब्दी वर्षात अधिकाधिक सामाजिक कार्य करण्याचे ठरविले आहे"

मातृशक्ती वक्त्या व "विश्वमांगल्य छात्र सभा"च्या प्रा माधवी शिंदे पंचपरिवर्तन द्वारे समाज सुदृढ,सुसंकृत व सुसंघटित व्हावा म्हणून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. कुटुंब प्रबोधन विषयाला अनुसरून त्यांनी कुटुंबियातील एकमेकांशी असलेला संवाद वाढायला हवा" असे प्रतिपादन करून पुढे म्हणाल्या देशाचे भवितव्य तरुण पिढीकडे असल्याने त्यांनी करिअर व पैसे कमविणे या पलीकडे जाऊन पितृऋण,मातृऋण,समाजऋण,

राष्ट्रप्रेम याकडे अधिक लक्ष देण्याची गरज

आहे.बदलत्या काळासोबत माणसाचे राहणीमान आणि विचारसरणी बदलली असली तरी कुटुंब ही संकल्पना आजही आपल्या जगण्याचा कणा आहे. कौटुंबिक नाते संबंध जपले पाहिजे.कुटुंबातील तरुण मुला मुलींना योग्य दिशा दाखवणे व त्यांना सुरक्षितता देणे हे घरातील ज्येष्ठांचे कर्तव्य असल्याचेही या वेळी त्यांनी सांगितले.कुटुंबातील लोकांनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मनात काय चालले आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करावा"

तुफान पर्जन्यवृष्टीमुळे सहवास वस्तीतील हे हिंदू संमेलन मनमोहन सोसायटीच्या मैदानाऐवजी सभागृहात घेण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस आकांक्षा देशपांडे ह्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.व कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.डॉ चेतन होशिंग यांनी "अफझलखानाचा वध" यावर अतिशय सुंदर पोवाडा सादर केला.

प्रा माधवी शिंदे यांचा सत्कार शुभांगी सुदामे यांनी तर योगेश थत्ते व डॉ चेतन होशिंग यांचा सत्कार मनमोहन सोसायटी चे अध्यक्ष संजीव महाजन यांनी केला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संभाजीभाग सहकार्यवाह अमोल जोशी यांनी संस्थेचे अध्यक्ष संजीव महाजन यांचा सत्कार केला.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक यांची मुख्य उपस्थिती होती. विजय मोने यांनी पसायदान गायिले. उत्कर्ष प्रकाशनचे उल्हास जोशी यांनी माधवी शिंदे यांना रवींद्र काळे अनुवादित "आधुनिक हिंदू धर्म का व कसा" हे पुस्तक भेट दिले.

उल्हास जोशी यांचा सत्कार योगेश थत्ते यांचे हस्ते करण्यात आला तर प्रा.माधवी शिंदे यांच्या हस्ते सूत्र संचालन करणाऱ्या आकांक्षा देशपांडे ह्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पद्मरेखा, मनमोहन सोसायटी,सहवास सोसायटी, भुजबळ परिसर, पाश्चिमा नगरी, रेवती, मेघराज, लक्ष्मीप्रसाद, आसावरी, विभावरी, विद्यापीठ सोसायटी, दामोदर अपार्टमेंट, आनंदनिकेतन, चिंतामणी, क्षिप्रा सोसायटी, के-५२, कृष्णाई कॉम्प्लेक्स, गीतगंगा, तसेच कर्वेनगर भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कन्नडमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०३ एप्रिल- पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026 अंतर्गत कन्नड तालुक्यातील मध्य मंडळ येथे कार्यकर्त्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, तालुका अध्यक्ष (मध्य मंडळ) सुनील पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, आध्यात्मिक आघाडीचे साहेबराव गवळी, संयोजक संजय श्रीकांत, अर्चना पवार, प्रतिभा मालकर, सौरभ कुलकर्णी, बाळासाहेब जाधव, नगरसेवक कचरू आव्हाळे, सुधाकर देवकर, पंचायत समिती सदस्य संतोष राठोड, स्वप्नील जहागिरदार, कैलास जाधव यांच्यासह मध्य मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरामध्ये संघटन बळकटीकरण, पक्षाची विचारधारा, बूथ व्यवस्थापन तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती कार्यकर्त्यांना देण्यात आली. यावेळी अनुभवी मार्गदर्शकांनी कार्यकर्त्यांना संघटनात्मक काम अधिक प्रभावीपणे कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## चोरट्यांचा डाव फसला; चोरीची चारचाकी अपघातात खड्यात



कन्नड : दि.०३ एप्रिल - चोरी करून पळवून नेण्यात आलेल्या चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याने चोरट्यांचा डाव फसल्याची घटना दि.०३ रोजी पहाटे समोर आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एम.एच.40 ए.आर. 2940 क्रमांकाची चारचाकी जामडी (ता. चाळीसगाव) येथून पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केली. ही गाडी नागद मार्गे कन्नडकडे येत असताना जुन्या गेस्ट हाऊसजवळ चालकाचा ताबा सुटल्याने अपघात झाला. अपघातात वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्यात जाऊन पडले. अचानक घडलेल्या या प्रकारानंतर चोरट्यांनी गाडी घटनास्थळीच सोडून पळ काढला. दरम्यान, स्थानिक नागरिकांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास नागरिकांच्या मदतीने वाहन खड्यातून बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अद्याप या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नसून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## खुलताबाद शहरामध्ये न प पाणीपट्टी व मालमत्ता कराची थकबाकी वसुलीची जोरदार मोहीम नागरिकांनी थकबाकी भरुन सहकार्य करा . मुख्याधिकारी समीर शेख

तभा. वृत्तसेवा

खुलताबाद .| . खुलताबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी . समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली असून, थकबाकीदारांविरुद्ध कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. थकबाकी यादीची तपासणी करताना काही नगर परिषद कर्मचाऱ्यांकडे देखील पाणीपट्टी व मालमत्ता कर थकीत असल्याचे निदर्शनास आले.



याबाबत मुख्याधिकारी यांनी तत्काळ आदेश देऊन संबंधित ४ कर्मचाऱ्यांची नळजोडणी बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, अलंग मोहल्ला येथील दोन नळजोडण्या देखील बंद करण्यात आल्या आहेत.

नगरपरिषद प्रशासन सर्व नागरिकांना आवाहन करते की, त्यांनी आपली थकीत पाणीपट्टी व मालमत्ता कर त्वरित भरावा. थकबाकी न भरल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नळजोडणी बंद करण्यात येईल, तसेच दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

नागरिकांनी नगरपरिषदेस सहकार्य करून आपली देयके वेळेत भरावीत, असे आवाहन करण्यात येत आहे. या पथकामध्ये नगरपरिषदेचे कायालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चैडेका अंकुश भराड पाटील जितेंद्र बोचरे अशोक भंडारी जय किशन दळवी नितीन गोल्हार. इरफान मामू राहुल कांबळे काशीम

## बसवेश्वर जयंती समितीच्या अध्यक्षपदी कुणाल खताडे



पैठण दि ०३ : - महात्मा बसवेश्वर जयंती पैठण उत्सव २०२६ निमित्त लिंगायत समाज बांधवांची सागर ज्यूस सेंटर बैठक घेण्यात आली.यावेळी सर्वानुमते कुणाल लक्ष्मण खताडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच यंदा १९ एप्रिल रविवार रोजी जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्याचे सर्वांनुमते ठरवण्यात आले..या बैठकीस लिंगायत संघर्ष समिती तालुका अध्यक्ष कबाडे अप्पा.सचिव गुलालकर,कैलासअप्पा डोळझापे डांगे अप्पा .वसंत ताकटे अप्पा. अजय परळकर .बुरकुले अप्पा. प्रा.बालाजी किलचे,येरटे अप्पा. कैलास काटकर.कृष्णा डोळझापे आदी समाजबांधव उपस्तित होते.


**नगर परिषद कार्यालय भोकरदन जि.जालना**

जा.क्र./सा.बां.वि./भोकरदन/2026/0614 दिनांक 22.04.2026

**निविदा सूचना वर्ष 2026-2027**

मुख्याधिकारी,नगर परिषद भोकरदन जि.जालना यांच्याव्दारे खालील कामासाठी नोंदणीकृत व अनुभवी प्रकल्प व्यवस्थापक व सल्लागार सेवा विभागाकडून सिलबंद पाकीटात दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | नगर परिषद क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्टयपूर्ण या योजनांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करीता प्रकल्प व्यवस्थापक व सल्लागार सेवा विभागाची नियुक्ती करणे | 10,00,000.00 | 10000.00 | 590.00 | प्रकल्प पूर्ण होई पर्यंत |

निविदा पध्दतीचा तपशील व वेळापत्रक

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | प्रसिध्दी दिनांक | 04.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |
| २. | दस्तावेज विक्री दिनांक | 04.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |
| ३. | दस्तावेज विक्री अंतिम दिनांक | 12.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |
| ४. | निविदा सादर दिनांक | 04.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |
| ५. | निविदा सादर करावयाचे अंतिम दिनांक | 12.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |
| ७. | तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्याची तारीख | 13.04.2026 | सांयकाळी 04:00 वाजता |

स्वाक्षरीत/- (अजय व्यवहारे) नगर अभियंता नगर परिषद भोकरदन

स्वाक्षरीत/- (ज्ञानेश्वर रेवगडे) लेखापाल नगर परिषद भोकरदन

स्वाक्षरीत/- (गजानन तायडे) मुख्याधिकारी नगर परिषद भोकरदन


## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान अंतर्गत चौथे सर्वेक्षण बाबत सोयगाव आगाराला भेट

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.३ एप्रिल |** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान अंतर्गत चौथे सर्वेक्षण दि २ गुरुवार रोजी सोयगाव आगारात संपन्न झाले. त्यासाठी विभागीय समिती जालना विभागातून मनिषा सपकाळ विभाग नियंत्रक,स्वप्नील मस्कर,उपयंत्र अभियंता यांनी व स्थानिक कमिटी सदस्य योगेश बोखारे यांनी बसस्थानक व आगाराची पाहणी केली.त्यावेळी आगाराचे वाहतूक निरीक्षक सतीश अंभोरे,सहाय्यक वाहतूक निरीक्षक,कैलास बागुल,सहाय्यक वाहतूक निरीक्षक,वर्जन जाधव,रवींद्र चौधरी,अशोक तायडे,पाळी प्रमुख प्रदीप जाधव,व लिपिक सतीश पाटील त्याच बरोबर चालक,वाहक व यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर प्रसंगी विभाग समिती सदस्यांचे शाल व पुष्प देऊन आगाराकडून स्वागत सत्कार करण्यात आला.त्याप्रसंगी समिती कडून आभार मानण्यात येऊन स्वछते बाबत समाधान ही व्यक्त करण्यात आले.




**जाहीर प्रगटण**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क.२२०/२०२६

अर्जदार :- १) सौ. वंदना निलेश पारखे वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खोली नं.२, दिचाळ देवजी बाडकर चाळ, जिवाळपाडा, साईधाम मंदिराच्या समोर, दत्ताणी पार्क कांदेवली पूर्व मुंबई २) सौ. शिल्पा आकाश आमराव वय ३४ वर्षे, धंदा, घरकाम, रा. भागाठाण ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. मंदा अमोल काकडे वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा टाकळीभान ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार:-निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, जगन्नाथ धोंडीबा कानडे व भिमावाई जगन्नाथ कानडे हे दोघे आपसांत नात्याने पती पत्नी ते रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते त्यापैकी जगन्नाथ धोंडीया कानडे हे दिनांक २३/०६/२०१३ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे मयत झाले असुन भिमायाई जगन्नाथ कानडे या दिनांक १९/०९/१९९५ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे, मयत जगन्नाथ धोंडीया कानडे व मयत भिमाबाई जगन्नाथ कानडे या दोन्ही मयतांना अर्जदार क्र.१ ते ३ या कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त दोन्ही मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी दिले, प्रकरणात पुढील तारीख दिनांक १२/०६/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापूर



**जाहीर प्रगटण**

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.२१७/२०२६

अर्जदार : १) मंदा भ्र. गुलाबराव शेळके वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. म.नं.४२ ए, अंबेडकर नगर, हुजूर, भोपाल, मध्यप्रदेश २) निर्मला माथवराय यशवंते यय ५२ वर्षे, धंदा, घरकाम, रा. म्हाडा कॉलनी, मेहकर ता. मेहकर जि. बुलढाणा ३) आशा अ. शंकर सोनुने वय ४६ वर्षे, धंदा घरकाम रा रांजणगाव शेणपुंजी ता गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर ४) रेखा भ्र. गजानन तांबेकर वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा रांजणगाव शेणपूंजी ता गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर ५) आरती कैलास शिंदे, यय ४३ वर्षे धंदा घरकाम रा. रामनगर, रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बावत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ या आपसांत नात्याने सख्या वहिणी असून अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे नारायण खंडु वाघ हे मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २०/१२/२०२५ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे गंगुबाई नारायण वाघ या दिनांक ३१/०३/२०२५ रोजी मयत झालेल्या आहे. मयत नारायण खंडू वाघ व मयत गंगुबाई नारायण वाघ यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वासरदार नसल्याचे नमुद करुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येतं की, अर्जदारांच्या प्रस्तूत अजांतील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदयावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील, करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी दिले, प्रकरणात पुढील तारीख दिनांक १२/०६/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर